उत्तर कोंकणाचा प्राचीन इतिहास.

उत्तर कोंकणाचा प्राचीन इतिहास.

लेखक,

रावबहादुर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी,

पीएच्. डी., एफ्. आर्. जी. एस्., जे. पी.,

फेलो, मुंबई युनिव्हर्सिटी; कॅंपूबेल गोल्ड मेडालिस्ट.

—:o:—

संपादक व प्रकाशक,

रामराव पुरुषोत्तम जोशी, बी. ए. (ऑनर्स्).

ऑनररी फेलो, विल्सन कॉलेज.

मुंबई.

१९२६

किंमत १ रुपया.

EARLY HISTORY OF NORTH KONKAN.

BY

Rao Bahadur P. B. JOSHI, Ph.D., F.R.G.S. J.P.

Fellow, Bombay University ; Campbell Gold Medallist.

EDITED AND PUBLISHED

BY

Ramrao Purushottam Joshi, B.A. (Hons.)

Honorary Fellow, Wilson College.

BOMBAY.

1926.

Printed by S. V. Kamat at Kamat Printing Press, Goverdhan Building, Parekh Street, next to West End Cinema, Bombay 4.

PREFACE.

THE following sketch of the history of Konkan being originally written for the Marathi Encyclopædia of Dr. Ketkar, does not go beyond the period of the commencement of the occupation of the province by the British. One noteworthy feature of this treatise is that it throws considerable fresh light on the history of the siege and capture of Bassein and Salsette by the Marathas in 1739 A. D. Whatever may have been the immediate cause that precipitated the war, one thing is certain *viz.* that the plan for undertaking the campaign against the Portuguese intruders and oppressors was under consideration and discussion for a period of ten years. A careful perusal of the correspondence that passed between Bajirao and Chimnaji Appa on the one side and Antaji and his brother on the other during this period of ten years clearly shows that the religious persecution of the Portuguese had become intolerable, and Antaji, as the religious head of the people of the district, was urging the Peshwa to release the people from this oppressive domination. But for some reason or another Bajirao could not find suitable opportunity to take up arms against the Portuguese. At last in January 1739 under the direction of Bajirao, Chimnaji Appa assumed command of the invasion against

the Portuguese and in the month of February regular siege wars laid against the fort of Bassein. In the month of May of the same year the Marathas became masters of Bassein and Salsette. It is admitted on all hands that the main cause of the loss of the Portuguese possessions in the North Konkan was their excessive religious zeal and their policy of religious intolerance. While the Portuguese were thus following a policy of religious persecution and oppression, their neighbours, the English, were adopting every measure to conciliate their subjects by a policy of justice, freedom and religious toleration and there is no wonder that people from the territories of the Portuguese as well as of the Marathas should have preferred to come and reside in the town and island of Bombay where they could enjoy perfect peace, freedom and happiness. Instead of pursuing a policy of interfering with the religious beliefs and observances of the people, the English Governors of Bombay were careful to adopt from time to time, measures to protect the ancient rights and privileges of their loyal and lawabiding subjects as will be seen from the Proclamation of Governor Phipps and the Patent of Chief Justice Courtney. (*Vide* Appendix C.).

In ancient India the province of Konkan was known by the name of Aparāntaka and in the Âdi Parva of the Mahābhārata we find an interesting reference to the town of Shūrpāraka. Passing on to historic times, we find

that the Mauryas held sway over Aparāntaka as is proved by the discovery of a fragment of the 8th Edict of Ashoka at Sopara by Pandit Bhagvanlal in 1882 A. D. Another town of great importance in Aparāntaka was Purī, the capital of the Mauryas as well as of the Shilāhāras. In the 7th century it was in such a flourishing condition that it was styled "The Goddess of the fortunes of the Western Ocean." The exact site of this interesting city still remains unsettled. Prof. Wilson held that it was at Thana; the late Sir James Campbell was of opinion that it might be the *Moreh* Bander to the North East end of Ghārāpurī or Elephanta and the late Rev. A. K. Nairne suggested that it might be the island of Ghārāpurī in the Bombay harbour. Mr. Cousins, in one of his archælogical reports, asserted that it must be the island of Elephanta in Bombay harbour. In his Early history of Bombay, Rao Bahadur P. B. Joshi fully concurs with the view expressed by Mr. Cousins and adds that the recent discovery of Buddhistic remains at Ghārāpurī and the derivation of the name Ghārāpurī itself tend to strengthen this view. The name Ghārāpurī appears to have been a corruption of the term Agrahārapurī. The Mauryas were followers of the faith of Gautama Buddha, Purī was their capital and Agrahārapurī was the place or land in the town of Purī assigned for the sustenance of the Buddha Bhikshus or priests. In the course of time the name Agrahāra was changed to Aghāra and the

word Agrahārapurī to Aghārapurī and from this to Ghārāpurī. The island of Shatshashthi (Salsette) offers a fine field to students of ancient history and antiquities for carrying on research work, because, in addition to the interesting caves and monuments of Kanheri, Kondivate, Jogeshvari, Mandapeshvar and Magathan there are old towns and sites like Ghodbander, Rajapur, Marol, Viharaoli, Paspaoli, Pahadi and others which contain relics of antiquarian interest.

A few years ago Mr. S. M. Edwards and Rao Bahadur P. B. Joshi were able to discover at Parjapur some images and relics of the period of the Shilāhāras. Two years ago some Municipal employess while carrying on excavations at Marol came across a stone image of a Yogi (Buddha period) and a hoard of coins belonging to the Mahommedan period ; and recently Prof. Velanker of the Wilson College has discovered a copperplate grant of the Shilāhāra King Aparājita dated Shaka 915 or A. D. 993. This grant is very important as it contains a full geneology of the Rashtrakutas of Malkhed who were the overlords of the Shilāhāras. Day by day fresh materials and documents are coming to light and I trust the day is not far distant when an Indian scholar will be able to give us in English garb a complete and connected sketch of the history and antiquities of our glorious Aparāntaka.

GIRGAON,
BOMBAY,
12th December 1925.

R. P. JOSHI.

विषयानुक्रम.

उपोद्घात.

——:०:——

ठाण्याचे माजी कलेक्टर मि. ए. के. नेर्न ह्यांनीं मुंबई ग्याझेटिअरकरितां लिहिलेला कोंकणप्रांताचा इतिहास प्रसिद्ध होऊन आज चाळिसाहून अधिक वर्षें लोटलीं. इतक्या अवधींत कोंकणच्या इतिहासावर अधिक प्रकाश पडेल अशा प्रकारची माहिती व साधनें उपलब्ध झालीं आहेत. ह्या साधनांचा उपयोग करून इंग्रजींत कोंकणप्रांताचा सविस्तर इतिहास लिहावा असा आमचा विचार होता; व त्याकरितां बिंबाख्यानाच्या छापील व हस्तलिखित प्रती, वंशावळी, बखरी आणि बाजीराव बल्लाळ, चिमणाजी अप्पा ह्यांनीं लिहिलेलीं पत्रें, त्याचप्रमाणें पोर्तुगीज व इंग्रज अधिकाऱ्यांनीं लिहिलेलीं पत्रें, सनदा वगैरे मिळवून त्या तपासून पहाण्याच्या उद्योगास आम्हीं लागलों होतों. मध्यंतरीं म्हणजे सन १९०१ ह्या वर्षी मि. एस्. एम्. एडवर्ड्स, आय्. सी. एस्. ह्यांच्या विनंतीवरून आम्हीं त्यांस मुंबई बेटाच्या प्राचीन इतिहाससंबंधीं एक लेख लिहून दिला होता व तो त्यांनीं आपल्या सेन्सस रिपोर्टांत व राइज् ऑफ बॉंबे ह्या पुस्तकांत आभारपुरःसर प्रसिद्ध केला आहे. परंतु राइज् ऑफ बॉंबे ह्या पुस्तकाची किंमत फार असल्यामुळें मुंबईच्या प्राचीन इतिहासावरील लेख स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावा·अशी

कांहीं मित्रांनीं सूचना केल्यावरून तो लेख सन १९०३ ह्या वर्षी "Early history of Bombay" ह्या नांवाच्या पुस्तकाच्या द्वारें आम्हीं प्रसिद्ध केला. ह्या पुस्तकावर इकडील व इंग्लंडांतील इतिहासज्ञांचे व विद्वानांचे अनुकूल असे अभिप्राय पडले; त्यांत आमचे संस्कृतज्ञ विद्वान् मित्र मि. जाक्सन, आय्. सी. एस्. व इंडिया ऑफिसमधील हिस्टरिऑग्राफर सर वुइलियम फॉस्टर ह्यांनीं दिलेले अभिप्राय महत्वाचे होते. सर वुइलियम ह्यांनीं आमच्या मुंबईच्या इतिहासावरील आपला परीक्षणात्मक लेख रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीच्या जर्नलमध्यें प्रसिद्ध करून त्याची एक प्रत आम्हांस अवलोकनार्थ पाठविली. ह्या गोष्टीचा येथें उल्लेख करण्याचें कारण इतकेंच कीं तेव्हांपासून सर वुइलियम ह्यांचा व आमचा पत्रव्यवहार सुरू होऊन आम्हीं परस्पर ऐतिहासिक प्रश्नांवर चर्चा करूं लागलों. सन १९०९ ह्या वर्षी डॉ. वुइलियम क्रूक हे इंडिया ऑफिस करितां फ्रायर्स् न्यू अकाउंट ऑफ ईस्ट इंडिया अँड् पर्शिया नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें काम करण्यांत गुंतले होते व त्या पुस्तकाच्या उपोद्घाताकरितां कोंकणसंबंधीं व विशेषतः मुंबई बेटासंबंधीं प्राचीन माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत होते. सर वुइलियम फॉस्टर ह्यांच्या सूचनेवरून त्यांनीं मुंबई बेटाच्या प्राचीन इतिहासासंबंधानें त्यांस आलेल्या शंकांचा उलगडा करण्याकरितां कांहीं प्रश्न आमच्याकडे पाठविले होते. त्यांत मुंबई बेटाच्या हद्दींतील सात बेटांचा उल्लेख

असून त्यांतील फ्रायरनें उल्लेखिलेलें मुंचवें हें काय आहे ह्या विषयीं त्यांस विशेष माहिती मिळवावयाची होती.*

सन १९०९ मध्यें आमचे मित्र मि. एस्. एम्. एडवर्डस्, आय्. सी. एस्. ह्यांजकडे मुंबई सरकारनें ग्याझेटिअर लिहिण्याचें काम सोंपविलें होतें. त्याकरितां मुंबईसंबंधीं ऐतिहासिक व इतर माहिती देणारे आम्हीं व मि. जाक्सन ह्यांनीं लिहिलेले लेख सदरहू ग्याझेटिअरमध्यें प्रसिद्ध झाले आहेत, आणि त्यांत पर्यायानें कोंकणचाही थोडाबहुत इतिहास आला आहे. ह्याच सुमारास मी आणि मि. जाक्सन कोंकण फोक्लोअर ह्या पुस्तकाकरितां साधनें गोळा करीत होतों. त्या वेळीं आमच्यापाशीं असलेल्या बिंबाख्यानाच्या प्रती, कौस्तुभचिंतामणि व इतर ऐतिहासिक लेख व पत्रें मि. जाक्सन ह्यांच्या अवलोकनांत आल्यावरून तुम्हीं कोंकणचा इतिहास लिहिण्याचें मनावर घेतल्यास मी आपणांस मदत करीन व तो आपण आपल्या दोघांच्या नांवें प्रसिद्ध करूं अशी त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली व त्याप्रमाणें जाक्सन साहेबही कोंकणच्या इतिहासाच्या माहितीचीं टिपणें करूं लागले. सन १९०९ च्या सप्टेंबर महिन्यांत जाक्सन साहेबांनीं पत्रद्वारें आम्हांस कळविलें कीं त्यांनीं इंडियन

* डॉ. कूक ह्यांचें हें पुस्तक इंडिया ऑफिसच्या आश्रयाखालीं प्रसिद्ध झालें असून त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत प्रस्तुत लेखक व डॉ. जदुनाथ सरकार ह्यांचे प्रस्तुत पुस्तकाच्या कामीं सहाय्य केल्याबद्दल आभार मानले आहेत. ह्या पुस्तकांतील डॉ. कूक ह्यांच्या टीपा (Notes) फार महत्त्वाच्या असून कोंकण प्रांताचा सविस्तर इतिहास लिहिणें झाल्यास हें पुस्तक फार उपयोगी पडेल.

ॲंटिक्वेरी ह्या ऐतिहासिक मासिकाचें सहसंपादकत्व पत्करिलें आहे. तरी त्या मासिकाकरितां मराठ्यांच्या इतिहासासंबंधीं व विशेषतः कोंकणच्या इतिहासासंबंधीं लेख पाठविण्याची आपण तसदी घ्यावी. त्याप्रमाणें वरील विषयावर लेख लिहिण्यास आम्हीं सुरुवात केली होती; इतक्यांत जाक्सन ह्यांच्या उद्वेगजनक निधनाची बातमी आल्यामुळें चित्त अस्वस्थ झालें व कोंकण फोक्लोअरसंबंधीं लेख लिहिण्याचें काम बंद पडलें. पुढें म्हणजे ता. २५ डिसेंबर सन १९११ रोजीं प्रोफेसर देवदत्त भांडारकर ह्यांनीं पुण्याहून पत्र पाठविलें त्यांतील आशय कीं जाक्सन साहेबांचीं इतिहासविषयक टिपणें (Notes) एन्थोव्हन साहेबांच्या सूचनेवरून आपणांकडे पाठवीत आहें. आपणांस हा विषय (कोंकण आणि भीमदेव) परिचित असल्यामुळें तद्विषयक निबंधांत अगर लेखांत आपण त्यांचा जाक्सन साहेबांच्या नांवानें समावेश कराल अशी साहेब मजकूर ह्यांस आशा आहे. प्रोफेसर साहेब आपल्या पत्रांत आणखी लिहितात कीं "तुमच्या १४ आगस्ट १९११ च्या पत्रांत उल्लेखिलेल्या कोंकण व भीमदेव ह्यांच्या संबंधींच्या टिपणांचा योग्य उपयोग करूं असें आश्वासन दिलें असल्यामुळें जाक्सन साहेबांच्या नोट्स् आपणांकडे पाठवीत आहें." हीं टिपणें वाचून व तपासून पहातां आमच्या असें निदर्शनास आलें कीं ह्यांतील बराच भाग बिंबाख्यान (माहिमची बखर), कौस्तुभ-चिंतामणि इत्यादिकांच्या हस्तलिखित प्रतींवरून घेतलेला आहे. ह्या विषयासंबंधानें म्हणजे त्यांतील कित्येक भागांच्या ग्राह्याग्राह्यते-

संबंधानें आमची परम्परांत पूर्वीं बरीच चर्चा झालेली होती. आणि त्या चर्चेअंतीं जाक्सन साहेब ह्यांचें असें मत पडलें होतें कीं ह्यांतील बराच भाग अविश्वसनीय व निराधार असल्यामुळें व त्यास इतर बाहेरील पुराव्याचा पाठिंबा नसल्यामुळें तो गाळून टाकावा लागेल व उत्तर कोंकणांतील शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण हे माध्यंदिन शाखेचे असून ते देवगिरीहून रामदेव यादवाचा पुत्र बिंब (भीम) ह्यांच्या समागमें उत्तर कोंकणांत आले ही गोष्टही ह्या हस्तलिखित बखरींच्या आधारें सिद्ध होते आणि तशाच अर्थाचा उल्लेख त्यांनीं आपल्या मुंबई ग्याझेटिअरकरतां लिहिलेल्या लेखांत भाग २, पृष्ठ १४ येथें केला आहे. *

सन १९१४ ह्या वर्षीं मुंबईच्या पाठारे प्रभु जातींतील कांहीं पुढारी गृहस्थांच्या विनंतीवरून "History of the Pathare Prabhus and their Gurus or Spiritual Guides" हा लेख लिहून तो आम्हीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला. त्यांतही कोंकण प्रांत व तेथील प्राचीन प्रमुख रहिवासी म्हणजे पाठारे प्रभु व यजुर्वेदी ब्राम्हण ह्यांचा इतिहास संक्षेपतः व क्रमशः आला आहे.

ता. ८ आक्टोबर सन १९२२ रोजीं ज्ञानकोशाचे संपादक डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर ह्यांनीं ४८१, शनवार पेठ, पुणें,

---

* All Yajurvedi traditions point to their having come originally from the Godavari Valley, where Tagara also lies.

येथून पत्र लिहिलें कीं आपण समक्ष भेटीअंतीं कबूल केल्याप्रमाणें ज्ञानकोशांत प्रसिद्ध करण्याकरितां उत्तर कोंकण प्रांताचा प्राचीन इतिहास लिहाल अशी आशा करितों.* त्या विनंतीस मान देऊन आम्हीं प्रस्तुत पुस्तकांत प्रसिद्ध होत असलेला लेख त्यांजकडे रवाना केला. तो मिळाल्यानंतर डॉ. केतकर ह्यांनीं ७।२।२३ रोजीं आणखी पत्र पाठविलें तें असें:—

रा. ब. डॉ. जोशी यांस,

सा. न. वि. वि. आपला सर्व लेख वाचून पाहिला. लेख वाचून समाधान झालें. आपणांस सवड झाल्यास आणखी लेखही

---

* To,

RAO BAHADUR DR. P. B. JOSHI,

BENAM HALL LANE, BOMBAY.

DEAR DR. JOSHI,

"I am just writing this note to you so that we may not forget what I said orally to you, and that is you undertake to write the History of North Konkan since say 1000 A. D., to 1800 A. D., with special reference to the history of each caste and community dwelling there × × × "

Yours sincerely,

(Sd.) SHRIDHAR V. KETKAR.

आपणांकडून आम्हांस मिळावेत व ती तसदी आपण घ्यावी असें मला वाटतें. प्रस्तुत लेखाच्या पूर्णतेस लागणाऱ्या गोष्टी लेखाच्या शेवटीं या विषयावरील वाङ्मय (Bibliographical Note) म्हणून आपण घालावी. × × × ह्या शिवाय ज्या विषयावर टीकात्मक लेख आपण आमच्याकरितां लिहावेत म्हणून आम्हीं सुचवितों ते येणेंप्रमाणें:—

(१) शुक्ल यजुर्वेदी (कोंकणकडील) ब्राह्मणांचा सविस्तर इतिहास १२ पृष्ठें.

(२) बिंबाख्यान.

(३) सह्याद्रिखंड (१) निरनिराळ्या प्रती, (२) ग्रंथाचें सामान्य स्वरूप (३) अविश्वसनीय व विश्वसनीय यांचें पृथक्करण. (४) टीकात्मक लेख.

सुचविलेले विषय घेतले म्हणजे आणखी घेऊं नयेत असें नाहीं. आपल्याकडून आपल्या आवडीच्या कांहीं विषयांची यादी यावी. कळावें हे विज्ञापना.

आपला,

(सही). **श्री. व्यं. केतकर.**

असो. आम्हीं पाठविलेल्या व डॉ. केतकर ह्यांस मान्य झालेल्या लेखांतील बराच भाग डॉ. केतकर ह्यांनीं ज्ञानकोशाच्या अकराव्या

भागांत निरनिराळ्या ठिकाणीं समाविष्ट केला आहे. परंतु त्यांच्या ह्या कृतीमुळें आमच्या लेखांतील बराच महत्त्वाचा भाग अप्रसिद्ध राहिला म्हणून कांहीं विद्वान् मित्रांच्या सूचनेवरून तो समग्र लेख स्वतंत्र पुस्तकरूपानें आतां प्रसिद्ध केला जात आहे.

महाराष्ट्रांतील कांहीं लेखकांचा असा समज झालेला दिसतो कीं पोर्तुगीजांच्या धर्मच्छलापासून हिंदूंस मुक्त करून वसई व साष्टी प्रांत हस्तगत करण्याचें कार्य बाजीराव बल्लाळ व चिमणाजी आप्पा ह्यांनीं स्वयंस्फूर्तीनें हातीं घेऊन सिद्धीस नेलें; परंतु वस्तु-स्थिति तशी नाहीं असें आमच्या संग्रहीं असलेल्या लेखांवरून सिद्ध होतें. हे लेख म्हणजे श्री. बाजीराव बल्लाळ, त्यांचे बंधु चिमणाजी अप्पा आणि नानासाहेब पेशवे ह्यांचा अंताजी रघुनाथ कावळे व त्यांचे बंधु रामचंद्रपंत ह्यांच्या बरोबर झालेला पत्रव्यवहार होय. ह्या पत्रव्यव-हारास आरंभ सन १७२९ पासून झाला असून तो सन १७४०।४२ पर्यंत सुरू होता. ह्या पत्रव्यवहाराच्या सूक्ष्म निरीक्षणावरून असें दिसून येतें कीं, वसई व साष्टी प्रांतांतील धर्मगुरु व सरदेसाई अंताजीपंत कावळे व इतर हिंदुबांधव ह्यांस पोर्तुगीज धर्मोपदे-शकांकडून होणारा धर्मच्छल असह्य होऊन त्यापासून आपली व आपल्या हिंदुबांधवांची मुक्तता व्हावी ह्यासाठीं अंताजी रघुनाथ ह्यांनीं ते प्रांत फिरंग्यापासून हस्तगत करण्याचें कार्य हातीं घ्यावें अशी श्री. शाहूमहाराज ह्यांजपाशीं याचना केली; आणि परधर्मी-यांच्या जुलमापासून त्यांची मुक्तता करण्याचें सत्कार्य आपण हातीं

घ्यावें अशी श्री शाहूमहाराज ह्यांजपाशीं याचना केली आणि परधर्मीयांच्या जुलमापासून त्यांची मुक्तता करण्याचें सत्कार्य आपण हातीं घ्यावें अशी शाहूमहाराजांनीं बाजीराव बल्लाळ ह्यांस आज्ञा केली. ह्यानंतर बाजीराव बल्लाळ व अंताजी रघुनाथ ह्यांची समक्ष भेट होऊन आपण दर्शविलेलें सत्कार्य लौकरच हातीं घेण्याचें त्यांनीं अंताजीपंतांस आश्वासन दिलें व ह्यापुढें पेशवे व अंताजीपंत कावळे ह्या दोघांमध्यें वसईवरील स्वारीच्या तयारी संबंधानें परस्पर पत्रव्यवहार सुरू झाला.

आमच्या संग्रहीं असलेल्या पत्रांत पेशव्यांनीं अंताजींचे बंधु रामचंद्रपंत यांस वसईच्या स्वारीसंबंधीं सन १७२९ मध्यें लिहिलेलें पत्र पहिलें आहे. त्या पत्रांत पेशवे लिहितात, " तुम्हीं जिवाजी गोविंद या समागमें पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर वर्तमान कळलें. त्यास आमचेही चित्तीं हाच हेतू आहे कीं कार्य करावें. अशा निमित्त राजश्री अंताजीपंतांस जें सांगणें तें सांगितलें आहे. × × ×" दुसरें पत्र त्याच सालचें म्हणजे सन १७२९ मधील असून तें चिमणाजी आप्पांनीं अंताजीपंत कावळे ह्यांस लिहिलें आहे. त्यांत आप्पासाहेब लिहितात, " ऐशियास अवघा प्रसंग तुम्हीं प्रत्ययास आणून दिला आहे. त्यास अनृत काय निमित्त भासेल ? अवघा प्रसंग सत्यच आहे व कार्यही कर्तव्य आहेच आहे. तुम्हीं चित्तांत संशय आणावा असा अर्थ नाहीं. कर्णाजी शिंदे यांजकडून मनुष्य देवविले ते आले नाहीं म्हणून लिहिलें, त्यास पहिलें

लिहिलें आहे; हल्लींही लिहिलेलें आहे. ते मनुष्य देतील." हें पत्र फार महत्त्वाचें आहे. कारण ह्यावरून असें निर्विवाद ठरतें कीं पेशव्यांस वसईप्रांत हस्तगत करण्याच्या कामीं पहिलें प्रोत्साहन व सूचना हीं अंताजी रघुनाथ व त्यांचे बंधु रामचंद्र रघुनाथ यांजकडून मिळालीं.

पुढल्या वर्षीं म्हणजे सन १७३० सालीं अंताजीपंतांस बाजीरावसाहेब लिहितात, "ऐशियास श्रावण पौर्णिमेची तीथ निघोन गेली. या उपरी अधिकामध्यें तीथ ठीक करणें. **आम्हीं राजश्री स्वामींची आज्ञा घेतली आहे.** स्वार होऊन पुण्यास येतों राजश्री पिलाजी जाधवराव यांसीं व रा. *श्रीकृष्णराव यांसीं पाठवून देतों. तुमचेंही उर्जित करूं. गंगाजी नाईक यांचें विषयीं लिहिलें त्यास तिकडे आल्यावर त्याचेंही उर्जित करूं. तुम्हीं त्याचें समाधान करणें." ह्यांतील "तुमचें उर्जित करूं" ह्या शब्दांचा अर्थ असा कीं अंताजी रघुनाथ हे मालाड प्रांताचे सरदेसाई व सरदेशपांडे होते व ती त्यांची जहागीर व वतन इन्‌क्विझिशनच्या कायद्याखालीं पोर्तुगीजांनीं जप्त केलीं होतीं तीं तुम्हांस परत मिळवून देऊं असें अंताजींस पेशव्यांनीं आश्वासन दिलें होतें.

आमच्या संग्रहीं असलेलें चौथें पत्र सन १७३० सालीं बाजीरावसाहेब ह्यांनीं अंताजीपंतांस लिहिलें असून त्यांतील मजकूर

---

* हे श्रीकृष्णराव कोण असावे ह्याचा पत्ता लागत नाहीं. कोणी इतिहास संशोधक ह्यासंबंधानें कांहीं शोध लावतील अशी आशा आहे

पुढें लिहिल्याप्रमाणें आहे. "हशम लोक कित्येक उठून गेले. × × × राहिले तेही उठून जातात. त्यास लोकांच्या पोटाची बेगमी करावी. अगर आपणांस काय आज्ञा कर्तव्य ते करावी म्हणून लिहिलें; ऐशियास तिकडील मामला कृष्णराव महादेव यांस सांगितला आहे. तिकडील बेगमीची व देहबुद्धीची बंदोबस्ताची आज्ञा कर्तव्य ते त्यांस केली आहे. ते तिकडे आलियावर जे बेगमी बंदोबस्ती कर्तव्य ते करितील. तुम्हांजवळ हवे व मगे तिकडील जे असतील ते मशार-निल्हेकडे घेऊन जाणें. त्यांस बहुत प्रकारें सांगितलें आहे. तुमचे ठायीं अंतर कोणेविशीं करणार नाहींत." ह्या पत्रावरून असें दिसतें कीं अंताजी रघुनाथ ह्यांनीं दर्शविलेलें कार्य सिद्धीस न्यावें अशी बाजीरावसाहेब ह्यांचीही उत्कट इच्छा होती आणि म्हणूनच त्यांनीं " तुमचे ठायीं कोणेविशीं अंतर करणार नाहींत " असें अभिवचन दिलें आहे. हें अभिवचन पूर्ण करण्याकरितां बाजीरावसाहेब ह्यांनीं कसकसे प्रयत्न केले ह्यासंबंधीं आणखी थोडी हकीगत येथें दिली असतां ती अप्रासंगिक होणार नाहीं. तसें करण्यापूर्वीं बाजीराव-साहेबांच्या ५ व्या पत्राचा विचार करूं.

पांचवें पत्र सन १७३१ सालचें असून तेंही बाजीरावसाहेब ह्यांनीं अंताजीपंतांस लिहिलें आहे. त्यांतील आशय मनन करण्या-सारखा आहे. ह्या करितां त्यांतील महत्त्वाचा भाग खालीं नमूद करितों:—

" "म" कार ग्रामची चिटी आली तेच बजिन्नस तुम्हीं पाठविली ते पाहून वर्तमान कळलें. सारांश कोण्हे गोष्टीचा संशय नाहीं; तथापि सावध असणें. फिरंगियास सल्याचें ठीक जाहलें नाहीं, व होईल सारखा भरोंसाही नाहीं; यास्तव हेवा लागे जे आहेत त्यांचा संग्रह केला पाहिजे; व त्यांस ग्राम, धाम, ठाण द्यावें म्हणून लिहिलें होतें. ऐशियास रा. कृष्णराव यांस पुनरुक्त दर्शनास यावयाची आज्ञा केली आहे. ते आल्यावर गांवही करून देऊं. आपलें वर्तमान वरचेवर लिहीत जाणें."

ह्या पत्रावरून असें दिसतें कीं हिंदुधर्माच्या रीतीप्रमाणें म्हणजे दंड हातीं घेण्यापूर्वी साम व दाम ह्यांचा उपयोग करावा ही राजनीति पेशव्यांस उत्तमप्रकारें अवगत होती. आणि म्हणूनच त्यांनीं सल्ला करण्याकरितां पोर्तुगीजांबरोबर पत्रव्यवहार करून अंताजी-प्रभृति हिंदु बांधवांचीं जप्त केलेलीं वतनें सोडून देऊन त्यांचा धर्मच्छल बंद करावा अशा अर्थाची त्यांस विनंति केलेली दिसते आणि ती अमान्य झाल्यामुळें पोर्तुगीजांशीं सल्ला होणें शक्य नाहीं व लढाई केल्यावांचून पोर्तुगीज वठणीस येणार नाहींत अशी पेशव्यांची खात्री होऊन "हेवा लागे जे आहेत त्यांचा संग्रह केला पाहिजे" असें त्यांनीं अंताजीपंतांस निक्षून लिहिलें आहे.

सहावें पत्र सन १७३१ सालचें असून तें चिमणाजी आप्पा ह्यांनीं अंताजीपंत ह्यांस लिहिलें आहे. त्यांत आप्पासाहेब लिहितात "××× ती....राजश्री. राव सातार्‍यास गेले आहेत ते लौकरच येतील

आणि तुमच्या खर्चाची बेगमी व गांवची सनद व हुजऱ्या ऐसें तुम्हांकडे पाठविलें जाईल. आपलें समाधान असों देणें. तुम्हीं फिरंगियाचे परम शत्रू आहां. हें फिरंगियास फारच असह्य; यास्तव तुम्हीं फिरंगियाचे सरहद्देपासून चहुंपांचां कोसांवर राहणें, त्यांच्या जवळ न राहाणें. बेलापूरचा मजकूर लिहिला, तर तेंही राजकारण राखून ठेवणें. तीर्थरूप आलियावर याविषयींचा विचार करणें तो केला जाईल. जाणिजे. आपलें वर्तमान वरचेवर लिहीत जाणें."

ह्या पत्रावरून असें निर्विवाद ठरतें कीं पेशवे व त्यांचे बंधु चिमणाजी आप्पा ह्यांचें अंताजीपंतांवर उत्कट प्रेम होतें व त्यांचें जीवित आपल्या पुढील राजकारणास फार उपयुक्त आहे असें ह्या बंधुद्वयास वाटत होतें. आणि ह्याकरितांच त्यांनीं आपण "फिरंगियाचे सरहद्देपासून चहुंपांचां कोसांवर राहणें. त्यांच्याजवळ न राहणें" अशी अंताजीपंतांस अगत्याची सूचना केली आहे.

आमच्यापाशीं असलेलें सातवें पत्र सन १७३१ सालचें असून तें बाजीराव बल्लाळ ह्यांनीं अंताजींस लिहिलें आहे. ह्या पत्रांतील विषय फारसा महत्त्वाचा दिसत नाहीं; परंतु पुढील वाक्यें विचार करण्यासारखीं आहेत. तीं अशीं:—

"+++ वरकड राजश्री सखोजी आंग्रे सरखेल यांजकडील वेठबेगारीचा उपसर्ग लागतो. ते विषयीं मशारनिल्हेस लिहिलें आहे. याउपरी वेठबेगारीचा उपसर्ग देणार नाहीं"

आमच्या संग्रहीं असलेलें आठवें अस्सल पत्र सन १७३१ सालचें असून तें बाजीरावसाहेब ह्यांनीं अंताजीपंतांस लिहिलें आहे. त्यांत बाजीरावसाहेब लिहितात "+ + + ऐशियास तुम्हीं जो मजकूर लिहिला तो यथार्थच; परंतु यंदां स्वारींतून आलियावरी तमाम लोक आपल्या घरी गेले आहेत. दुसरी गोष्ट राजकार्यभागानिमित्त राजश्री स्वामींच्या दर्शनास स्वार होऊन गेलों यास्तव तो प्रस्तुत योग घडत नाहीं. सातारियाहून पुण्यास आलियावरी तुम्हांस भेटीस बलाऊन कार्यभाग केला जाईल. + + +"

ह्या पत्रावरून असें दिसतें कीं फिरंग्यांपासून वसई प्रांत हस्तगत करण्याचें कार्य पेशव्यांनीं लौकर हातीं घ्यावें अशी अगत्याची विनंति अंताजीपंत पेशव्यांस वारंवार करीत होते. परंतु अन्यत्र राजकारणांत गुंतल्यामुळें बाजीरावसाहेब तें कार्य लांबणीवर टाकीत होते.

ह्यापुढें आमच्यापाशीं असलेला महत्त्वाचा दस्तैवज म्हटला म्हणजे अंताजी व त्यांचे बंधु ह्यांस पेशव्यांनीं दिलेला कौल होय. ह्या दस्तैवजांतील कांहीं भाग ऐतिहासिकदृष्ट्या फारच महत्त्वाचा आहे; कारण त्यावरून मुसलमानी अमदानींतिल व पोर्तुगीजांच्या अमदानींतील माहिती अनायासें उपलब्ध होते. हा कौल फार विस्तृत असल्यामुळें येथें सबंध देतां येत नाहीं; आणि म्हणून त्यांतील कांहीं भाग खालीं नमूद करितों. तो असाः—

" मोकदमान् व म्हातारीयांन् व मढवीयांन्, बेरयांन्, मुजारीयांन् व समस्त जमीदारांन् प्रा। १४ वी। का वसई–बाहादरपूर कि॥ सोपारा प्रगणे मालाड व प्रा। मरोळ व माहीम, मुंबई, उरण, मोरे व प्रा। शहावान, खैरणे, प्रा। पंचनद व प्रा। आठगांव, अणजोर व प्रा। काम्हणखांच, सायेवान व प्रा। मनोरा व किल्ले प्रा। असेरी व प्रा। माहब प्रा। केळवें माहीम, व प्रा। तारापूर व प्रा। ओवळी व प्रा। कामण सदर्हु प्रा। शिरगांवसुद्धां इसन्ने सलासिन मया व अलफ (शके १६५३) महजर लिहून दिल्हा ऐसाजे, तुमची देशमुखी व देशपांडेगिरीचा हक्क, लवाजिमा वगैरे पट्टी, पासोडी, पंचोत्रा, मांडवटक्का, घटिका, पाट, अंत्रपट, विडा टिळा, पद, प्रायश्चित्त, साटबाट व दरबिघा कुडव (१) एक साली व कुळबाब, कुळकानू, याप्रमाणें व शिलोत्रे दरगांवास शेत एक, जमीन बिघे दोन याप्रमाणें पूर्वापार बादशहा सुलतान अल्लाउद्दीन गाजी शहर बेदर, खास मोहर सनद सन ८२४ भोगवटा चालत आला, त्याजपुढें बादशहा सुलतान बाहदर निजामशाही सन ९२४ त्यापुढें मुलकांत फिरंगियांचा अंमल जाहला. त्यास पूर्वापार प्रमाणें तुमचा हक्क, लवाजिमा बासतांवरे बोस बस्तियांव पुर्तुगाल त्याजपूर्वापार सनद बमुजीब सनद खास करून दिली, फिरंगी सन १५८० पंधराशें ऐंशीमध्यें करून दिली ते समयीं गोंव्यामध्यें विजुरे मतीस अलबूकेर्क, त्यानें अंमल सुरळीत दिला. त्याउपरी सन १६११ मध्यें बादशहा फिलीप याची सनद जाहली. कुळबाब, कुळकानू, भोगवटा, लुईलोरेस दतावर विजुरे गोंव्यामध्यें

होता त्याणें चालविला. यावर रेंबोजांव बादशहा याणें सनद १७१४ मध्यें पुन्हा सनद पाठविली. वतन कुळबाब, कुळकानू वासकु ऐनोद सिनोर देमिनेंज विजुरेनें अंमल सुरळीत दिला. त्यामध्यें ज्यांव् सालबान् दि गामा विजुरे बंदर गोंवा, त्यानें सनद करून दिली, व सर्व मोकासदारांच्या हातचीं लिहिलीं घेऊन दिल्हीं कीं, एक लवाजिमा, कुळबाब, कुळकानू चालवावयास मुजाहीम होईल, त्यास दंड होन पांचशें ऐसे धांडोरे अहद् मुंबई तहद् दवण पिटिले. त्यास सर्व जनास महशूर असे. ऐसें सुरळीत चालत असतां, अकस्मात श्रीमंत राजश्री कृष्णरावजी सुभे कल्याण स्वामी यांचा व फिरंगी यांचा विघाड जाहला. सुरसन इहिद्दे सलासिन मया व अलफ मध्यें (शके १६५२) जाहला, त्यास घाटावरून राजश्री पिलाजी जाधवराव आले. त्यांणीं छ १७ जिलकादीं कांव्याचा कोट फत्ते केला. मुलूख बारा प्रगणा काबीज केला. त्यास जेव्हां मुलकास कौल सादर करूं लागले मग आपली अट घातली कीं, आमच्या देशमुखांशिवाय आपला कौल न घेऊं, तेव्हां तुम्हांखेरीज कौल आपुला न घेतला. मग तुम्हांस आणून तुमचे हातीं कौल घेतला. त्यास तुम्हांस सनद श्रीमंत राजश्री मुख्य पंत प्रधान स्वामींहीं पाठविली. सन इहिद्दे सलासिन मया व अलफ (शके १६५२) छ ६ मोहरमीं सादर केली ×××" ह्यावरून असें स्पष्ट होतें कीं अंताजीपंतांपाशीं असलेले जुने दस्तैवज म्हणजे मुसलमानी अमदानींतील व पोर्तुगीजांच्या अमदानींतील राजकर्त्यांनीं दिलेल्या सनदा, आज्ञापत्रें व इतर कागद

त्यांनीं पेशव्यांकडे सादर केले होते. आणि म्हणूनच सदर कौलांत मुसलमानांच्या व पोर्तुगीजांच्या अमदानींतील राज्यकर्त्यांचा व अधिकाऱ्यांचा नामनिर्देश केला आहे व त्या त्या लेखांतील आशय व सनही दिले आहेत. ह्या दस्तैवजांतील लक्षांत ठेवण्यासारखी दुसरी गोष्ट अशी आहे कीं ह्या प्रांतांतील रहिवाशांवर अंताजी-पंतांचें वजन फार होतें व सर्व हिंदु रयत त्यांस पूज्य मानीत असे. आणि त्या करितांच " आमच्या देशमुखां (अंताजीपंतां) शिवाय आपुला कौल न घेऊं " अशी त्यांनीं पेशव्यांस अट घातली होती. ती अट पेशव्यांनीं आनंदानें मान्य केली आणि म्हणूनच " मग तुम्हांस आणून तुमचे हातीं कौल घेतला " असे शब्द ह्या कौलांत नमूद झालेले दिसतात.

वसईवर पेशव्यांनीं स्वारी करून पोर्तुगीजांच्या धर्मच्छलापासून सर्व हिंदु बांधवांची लौकर मुक्तता करावी अशी अंताजी व त्यांचे बंधु ह्यांस उत्कंठा लागलेली होती व अन्य राजकारणांमुळें तें कार्य पेशवे लांबणीवर टाकीत होते. ह्या त्यांच्या दिरंगाईमुळें अंताजीपंतांस विषाद वाटत होता व त्यांचें मन अस्थिर झालें होतें ही गोष्टही पेशव्यांस पूर्णपणें अवगत होती. अंताजींवर पेशव्यांचा अप्रतिम लोभ होता, त्यांस ते वारंवार भेटीस बोलावीत असत, त्यांची सल्लामसलत घेत असत व तुमचें उर्जित करूं असें त्यांस त्यांनीं आश्वासन दिलें होतें. परंतु हें आश्वासन पूर्ण करण्याची

संधि बाजीरावसाहेबांस त्यांच्या महत्त्वाच्या इतर व्यवसायांमुळें मिळाली नव्हती. अशी स्थिति असल्यामुळें पुढील कल्पना बाजीरावसाहेबांच्या मनास रुचली. ती अशी कीं, इंग्रजांचें व पोर्तुगीजांचें सख्य असल्यामुळें अंताजींचें इनाम व वतन परत मिळविण्याचें कार्य इंग्रजांच्या मार्फत घडवून आणावें. ह्या उद्देशानें बाजीरावसाहेबांनीं इंग्रजांच्या मुंबई येथील गव्हर्नरास सन १७३४ च्या मार्च महिन्याच्या तिसऱ्या तारखेस एक पत्र लिहिलें. दुर्दैवानें तें पत्र उपलब्ध नाहीं. परंतु मुंबईचे गव्हर्नर जॉन हॉर्न् ह्यांनीं ता. ६ मार्च सन १७३४ रोजीं त्या पत्रास जें उत्तर पाठविलें त्याची नक्कल आम्हांपाशीं आहे. तिजमधील मजकूर पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:—

BOMBAY CASTLE 6TH MARCH 1734.

To,

The Illustrious Bajirao Pandit Pradhan, Prime Minister of the Most Excellent Shahu Raja. John Horn, President of India, Persia and Arabia, by the Most Illustrious English Company, Governor and Commander-General of the Island and Castle of Bombay and all its dependencies, by His Most Serene Majesty of Great Britain, whom God preserve, sends him greeting. I have received your letter of the 3rd instant, in which you say that Antaji Raghunath, your servant, had every claim

to an Inam, which from antiquity (his forefathers) had enjoyed in the Portuguese Territories, granted by the ancient Emperors of Hindustan and afterwards confirmed by the Kings of Portugal and continued by the Viceroys of Goa, (in proof of) which he had several documents; but that he, the said Antaji Raghunath, having been accused before the Tribunal of the Inquisition, craves your protection, and therefore you desire that the said documents be examined in our Court of Judicature, where, if they be found true, an intimation may be made to the Portuguese to abide by what may be reasonable, to which I beg to reply. That you are aware that the decision of such claims (suits) rests solely with the Government that granted the Inam, and that no other (Government) can interfere, and this being so, it is useless for the said Antaji Raghunath to justify his claims in any tribunal, nay for any Government to interfere with its authority or request, if the said Antaji Raghunath is accused before the Inquisition over which the Royal Authority itself has no power. I hope you will command me in other business in which I may be serviceable (to you)."

ह्या पत्रांतलि आशय असा कीं अंताजीपंतांवर पोर्तुगीजांच्या कोर्ट ऑफ इन्क्विझिशनचे धार्मिक आरोप असल्यामुळें त्यांच्या संबंधानें मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांस पोर्तुगीज सरकाराकडे अंताजी-

पंतांतर्फे कोणत्याही प्रकारची शिफारस करितां येत नाहीं; कारण कोर्ट ऑफ इन्क्विझिशनच्या निकालावर व सत्तेवर खुद्द पोर्तुगाल देशाच्या राजाचाही अंमल चालत नाहीं. म्हणून आम्हांस तुमचा सेवक अंताजी रघुनाथ ह्याच्यासंबंधानें कोणत्याही प्रकारची विनंति न करितां इतर कार्य असल्यास सांगावें व तें आम्हीं करूं. वरील आशयाचें मुंबईच्या गव्हर्नराचें पत्र पाहून अंताजींचें कार्य सामोपचारानें होत नाहीं अशी बाजीरावसाहेबांची खात्री झाली व अंताजींप्रमाणेंच पोर्तुगीजांवरील स्वारीचें कार्य लौकर हाती घ्यावें असें त्यांस वाटूं लागलें; ह्या त्यांच्या उद्देशावर पुढील पत्रानें चांगला प्रकाश पडतो. तें पत्र सन १७३४ सालचें असून त्यांतील आशय खालीं नमूद केल्याप्रमाणें आहे.

" +++ ज्याचे तेच होऊन कार्यभाग करावयास सिद्ध आहेत, परंतु द्वितीय दिवशीं स्वामींनीं पदात सैन्याचें साहित्य येऊन पोंहचेसें केलें. यांनीं स्वामींचें ध्वजारोहण होतें. सैन्य पाठविणें तें अगोदर 'र'कार ग्रामीं पाठवावें. म्हणजे नेमिल्या नियमाप्रमाणें कार्यभाग सिद्धीस पावेल म्हणून कित्येक तपशील लिहिले. ते लोक आले, ऐशियास तुम्हीं लिहिला मनसुबा बहुत उत्तम आहे; परंतु याचा विचार बहुत चौकशीनें करणें तो आधीं करून जेथील तेथें ठाकठीक करून खानगी करावी लागते; तरी तुम्हीं बहुत बहुत जलदीनें हुजूर येणें. एक पळाचाही विलंब न लावितां येणें. विचार करून टांकोटांक तेचक्षणीं तुमची खानगी करून एक घडी तुम्हांस ठेवणार नाहीं. तरी बहुत त्वरेनें येणें."

ह्या पत्रांत दर्शविल्याप्रमाणें अंताजीपंत बाजीरावसाहेबांच्या भेटीस बहुत जलदीनें गेले असावे व भेटीनंतर सल्लामसलत होऊन पेशव्यांनीं त्यांस कार्याची दिशा व सेनासमुदायासंबंधीं अन्य तऱ्हेची माहिती व सामुग्री दिली असावी. ह्यानंतर अंताजीपंत आपल्या गांवीं परत येऊन कार्याच्या सिद्धतेस लागणारी सामुग्री गोळा करूं लागले व हल्ला करण्यास ही संधि उत्तम आहे व तसें केल्यास तीन ठिकाणें हस्तगत होऊन द्रव्य अमित मिळतें. अशा अर्थाचें पत्र त्यांनीं लिहिलें. त्या पत्राचें उत्तर पेशव्यांनीं अंताजीपंतांस पाठविलें. त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें दिल्याप्रमाणें आहेः—

" × × × तीन ठिकाणें एकेच येलगारानें हस्तगत होऊन द्रव्य अमित मिळतें. आणि स्वामीकार्य ह्मणोन चित्तावरी घेत नाहीं. तें कळलें. याउपरी यांच्या तुमच्यांत कार्य जाहलें तरी जाहलें. उप्रांतीक होत नाहीं. त्याचें आरमार येऊन बंदोबस्ती होईल ह्मणोन कित्येक विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशियास तुम्हीं लिहिलेला अर्थ यथार्थच असे. तुम्हीं साहस करितां कमी न केली, मग सिद्ध करणें तें केलेत, परंतु चारी गोष्टी एकसमयावच्छेदें करीन ह्मटल्या परिणाम कैसा लागेल ? विचारें कर्तव्य तें करावें लागतें. तरी तुम्हीं आधीं येथें येणें. सर्व हरिद्र चित्तांत आणून तुमचेंच विचारें आज्ञा कर्तव्य तें केली जाईल. सारांश तुम्हीं येथें येणें. फकरुद्दीन पाटेल व सैयदअल्ली शाबासकर यांस कौल पाठवावे ह्मणोन लिहिलें, त्याजवरून तुमच्या लिहिल्याप्रमाणें कौल पाठविले असत."

आमच्या संग्रहीं असलेल्या पेशव्यांच्या पत्रांतील बारावें पत्र सन १७३५ सालचें असून तें अंताजीपंतांच्या लवाजम्यासंबंधीं आहे व त्यास आज्ञापत्र असें म्हटलें आहे. सहरहू आज्ञापत्र बाळाजी बाजीराव ह्यांनीं पेशव्यांचे अधिकारी ह्या नात्यानें लिहिलेलें असून तें महत्त्वाचें असल्यामुळें आम्हीं समग्र खालीं नमूद करीत आहों.

" आज्ञापत्र राजश्री बाळाजी बाजीराव ता॥ मोकादम निवर यांनीं प्रांत फिरंगाण सुरुसन सीत सलासिन मया व आलफ. (शके १६५७), राजश्री अंताजी रघुनाथ सरदेसाई व सर देशपांडे, प्रांत मजकूर यांचा सुदामत हक्क, लवाजिमा व भोगभोगवटा चालत आला आहे त्याप्रमाणें चालवीत जाणें; म्हणून तीर्थरूप राजश्री पंत-प्रधान यांचें पत्र सादर आहे, त्याप्रमाणें चालवीत जाणें. यास खलेल करावयास गरज नाहीं. जाणिजे १७ माहे सवाल आज्ञा प्रमाण. "

ह्यापुढें असें दिसतें कीं सामदामानें पोर्तुगीज ठिकाणावर येत नाहींत असें पाहून त्यांच्या मुलखावर स्वारी करावी असा पेश-व्यांचा निश्चय ठरून अंताजीपंत व बाजीरावसाहेब त्या कार्याच्या तयारीस लागले. परंतु बाजीरावसाहेब ह्यांचा राजकारणव्यवसाय अनेक प्रकारचा असल्यामुळें व त्यांच्या राजकारस्थानाची व्याप्ति विस्तृत असल्यामुळें त्यांचें लक्ष दूरदूरच्या व विशेष महत्त्वाच्या अशा राजकारणांत नेहमीं गुंतलेलें असे. परिस्थिति अशी असल्या-

मुळें पोर्तुगीजांवरील स्वारीचें कार्य निश्चयानें हातीं घेण्यास पेशव्यांस सन १७३९ पर्यंत अवकाश व संधि हीं मिळालीं नाहींत. हिंदूंचा धर्मच्छल आणि अंताजी रघुनाथ कावळे प्रभृति पुढाऱ्यांनीं शाहू महाराजांकडे नेलेली फिर्याद हीं पोर्तुगीजांवरील स्वारीची प्रधान कारणें होत असें ह्या लेखांत मागें दर्शविलेंच आहे. व ह्याच गोष्टी पोर्तुगीजांच्या वसई व साष्टी प्रांतांतील उच्चाटनास कारणीभूत झाल्या असा मुंबई ग्याझेटिअरकारांचाही अभिप्राय आहे, कारण ह्यासंबंधानें ग्याझेटिअरच्या इंग्रज संपादकाचे पुढील उद्गार आढळतात:--

"The intolerance as to religious matters from which the Native subjects of Portugal suffered has already been described and it is said that the Hindu inhabitants of Salsette complained of the intemperate zeal with which it was attempted to convert them to the Roman Catholic faith, and to subject them to the terrors of the Inquisition."

राजकार्यबाहुल्यामुळें बाजीरावसाहेबांस पोर्तुगीजांवरील स्वारीचें कार्य सन १७३९ पर्यंत स्वतः हातीं घेण्यास सवड मिळाली नाहीं. व दुसरें कारण असें कीं त्या सालीं त्यांस उत्तर हिंदुस्थानांत जावयाचें होतें; तथापि पोर्तुगीजांवरील स्वारीचें कार्य अतःपर दिरंगाईवर टाकणें योग्य व हितावह नाहीं असें वाटून त्यांनीं सन १७३९ च्या जानेवारी महिन्यांत चिमणाजी आप्पांची त्या कामगिरीवर

योजना केली. त्याप्रमाणें बरोबर सैन्य घेऊन चिमणाजी आप्पा उत्तर कोंकणांत येऊन त्यांनीं खत्तलवाडा, डहाणू, केळवें, शिरगांव आणि तारापूर हीं गावें आपल्या हस्तगत केली. ह्या ठिकाणीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं येथील सर्व हिंदु प्रजेचे कुलगुरु व धर्मोपाध्याय हे अंताजीपंत कावळे ह्यांचेच आप्त व स्वशाखीय असल्यामुळें व धर्मगुरु ह्या नात्यानें हिंदु प्रजेवर त्यांचें वजन विशेष असल्यामुळें वरील ठिकाणें हस्तगत करण्याच्या कामीं चिमणाजी आप्पांस त्यांजकडून बरीच मदत झाली. ह्यानंतर सन १७३९ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १७ व्या तारखेस चिमणाजी आप्पांनीं वसईच्या किल्ल्यास वेढा दिला. तीन महिने लढाई होऊन शेवटीं पोर्तुगीज जेरीस आले व त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें आणि कांहीं अटींवर किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन करण्यास तयार झाले. त्या तहान्वयें ता. १६ मे सन १७३९ रोजीं वसईचा किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन झाला व ह्यापुढें वसई व साष्टी प्रांतांवर मराठ्यांचा अंमल सुरू झाला.

वसईप्रांत पोर्तुगीजांपासून हस्तगत करण्याच्या कामीं आरंभापासून तों शेवटपर्यंत अंताजीपंत कावळे व त्यांचे स्वशाखीय बांधव आणि इतर क्षत्रिय अनुयायी ह्यांनीं जें सहाय्य केलें त्याची त्रोटक हकीगत आम्ही वर दिलीच आहे. मागील एका पत्रांत "तुमचें ऊर्जित करूं" असें पेशव्यांनीं अंताजीपंतांस आश्वासन दिलें होतें; तेव्हां ही गोष्ट लक्षांत ठेवून बाजीरावसाहेबांनीं अंताजी-

पंत व त्यांचे बंधु ह्यांचें पूर्वीचें वतन त्यांच्याकडे पूर्ववत् चालू रहावें अशा अर्थाचें आज्ञापत्र सन १७४० सालीं काढिलें तें असें:—

" छ माा अजम रामचंद्र रघुनाथ व गणेश रघुनाथ व अंताजी रघुनाथ सरदेसाई व सरदेशपांडे, प्रांत फिरंगाण, यांस बाजीराव बल्लाळ प्रधान सुरुसन इहिद्दे अर्बैन मया व अलफ (शके १६६२) प्रांत मजकूरचे सरदेसाई व सरदेशपांडेपणाचें वतन तुमचें पुरातन आहे; त्याप्रमाणें तुम्हांस हुजूरच्या सनदा आहेत, त्याप्रमाणें करार केले असे; तरी तुम्हीं वतन सदर्हुप्रमाणें अनुभव करणें, कोणी इस्कील करील त्यास करावयासीं प्रयोजन नाहीं. जाणिजे छ ६ माहे मोहरम पाा हुजूर."

ह्यानंतर सन १७४० सालीं (म्हणजे शके १६६२ वैशाख शुाा १२ रोजीं) नर्मदेच्या कांठीं रावेरखेडी ह्या गांवीं बाजीरावसाहेब निवर्तले व हें वर्तमान ऐकून अंताजीपंत व त्यांचे अनुयायी ह्यांस असह्य दुःख झालें. बाजीरावासारखा शूर व प्रतापी पुरुष महाराष्ट्रांतच नव्हे तर अवघ्या भरतखंडांतही शिवाजीमहाराजांच्या पश्चात् निर्माण झालेला दिसत नाहीं. आणि असें नररत्न त्याच्या यशस्वी कारकीर्दीच्या ऐन भरांत मृत्युमुखीं पडले ही समस्त हिंदी जनतेची अत्यंत शोचनीय हानी झाली असें आमच्या कट्ट्या परद्वीपस्थ शत्रूंसही कबूल करावें लागेल. असो. बाजीरावसाहेब निवर्तल्यानंतर थोड्याच अवधींत आप्पासाहेबही स्वर्गवासी झाले. बाजीराव बल्लाळ

ह्यांच्या मरणानंतर त्यांचे ज्येष्ठ पुत्र बाळाजी उर्फ नानासाहेब ह्यांस पेशवाईची गादी मिळाली. पोर्तुगीजांपासून वसईप्रांत घेण्याच्या कामीं अंताजीपंत कावळे ह्यांनीं बजावलेली कामगिरी नानासाहेबांस अवगत होती; परंतु अंताजीपंतांचें इनामगांव परत देण्याच्या बाजीरावसाहेबांनीं दिलेल्या अभिवचनाची पूर्तता करण्याच्या कामीं नानासाहेबांकडून दिरंगाई झाल्यामुळें अंताजीपंतांस राग आला आणि त्यांनीं पुण्यास जाऊन पेशव्यांच्या दरबारीं निर्भर्त्सनेचे उद्गार काढले असें आमच्या संग्रहीं असलेल्या, अंताजींचे मित्र खंडोजी माणकर ह्यांच्या पत्रावरून ध्यानांत येतें. ह्या पत्रांत खंडोजी माणकर म्हणतात " ×× ह्यांचें (अंताजींचें) तोंड अफाट मुळें दरबारांत यांचे पदरीं खटाई पडली. गांवसींव मुतलस्व प्राप्त व्हावा तो न जहाला ×× "; ह्यावरून असें दिसतें कीं अंताजींचें वतन जरी चालू केलें होतें तरी मालाड प्रांतांतील त्यांचें इनाम त्यांस दिलें नाहीं. ह्या गोष्टीमुळें अंताजींच्या मनास फार खेद झाला व कावळ्यांच्या घराण्यांत अशी आख्यायिका रूढ आहे कीं अंताजीनें निराश होऊन पेशव्यांच्या दरबारांत जाऊन भर दरबारांत " तुम्हीं वचनभंग केल्यामुळें तुम्हांस पुत्रशोक लागेल " असा नानासाहेबांस शाप दिला आणि मालाडास निघून आले व तेथें त्यांचें थोड्याच दिवसांत देहावसान झालें.

अंताजीपंत कावळ्यांस पुत्रसंतान नव्हतें व त्यांचे बंधु त्यांच्याप्रमाणें विद्वान् व साहसीहि नव्हते; परंतु त्यांचे भाचे तुकंभट्ट धर्म-

भट्ट जावळे, पळशीकर, हे पहिल्याप्रतीचे विद्वान् असून त्यांनीं अग्निहोत्र चालविलें होतें. अंताजींचें ह्या तुकंभट्ट पळशीकरांवर विशेष प्रेम होतें व हे तुकंभट्ट मोठे साहसी व दृढनिश्चयी असल्यामुळें आपले मातुल अंताजीपंत ह्यांचा पेशव्यांनीं केलेला अपमान त्यांस सहन झाला नाहीं. आणि वसई व साष्टी प्रांतांतील हिंदुजनतेमध्यें धर्मगुरु ह्या नात्यानें तुकंभट्ट जावळे पळशीकर ह्यांचें वजन व महत्त्व फार असल्यामुळें पेशवे व त्यांचे ज्ञातिबंधु ह्यांच्यासंबंधानें अनुदारतेनें उद्गार ह्यांच्याकडून प्रसंगविशेषीं निघत असत. ही गोष्ट जोगळेकर प्रभृति त्या प्रांतांतील पेशव्यांच्या जातभाईस रुचत नसे व ह्यामुळें विवाह व्रतबंध वगैरे शुभकार्यप्रसंगीं मानापमानासंबंधीं वारंवार तंटे उपस्थित होत असत. तुकंभट्टांचें म्हणणें कीं कावळे हे येथील मुख्य धर्मगुरु असल्यामुळें व मीं त्यांचा प्रतिनिधि असल्यामुळें सर्व कार्यांत अग्रेसरत्वाचा व टिळाविड्याचा मान मला मिळत गेला पाहिजे. उलटपक्षीं पेशव्यांचे जातभाई म्हणत कीं आम्हीं राज्यकर्त्यांच्या जातीचे असल्यामुळें सर्व मंगलकार्यांत पहिला मान आम्हांस दिला पाहिजे. ह्याप्रमाणें मानापमानासंबंधीं भांडणें बरेच दिवस चालत होतीं व त्यांत पेशव्यांनीं स्वतः जरी अंग घातलें नाहीं तरी त्यांचे वसई प्रांतांतील चित्पावन अधिकारी आपल्या ज्ञातिबांधवांस राजरोस सहाय्य करीत असत. ह्यापुढें थोड्याच कालावधींत हीं भांडणें विकोपास जाऊन

सन १७४२ त एके दिवशीं गोविंदभट्ट जोगळेकर प्रभृति कोंकणस्थ ब्राह्मणांनीं एकत्र जमून तुकंभट्ट जावळे, पळशीकर, ह्यांच्या अग्निहोत्राचा उच्छेद केला. असें झाल्यामुळें राज्यकर्त्यांपाशीं दाद मागण्याकरितां तुकंभट्टांनीं पेशव्यांकडे जाऊन फिर्याद केली. त्यांतील आशय कीं "गोविंद भट्ट जोगळेकर, महादाजीपंत फडणीस वगैरे वसई येथील कोंकणस्थ ह्यांनीं आमच्या श्रौताग्निकुंडाचा विनाकारण उच्छेद केला; सबब त्याची चौकशी होऊन आमचें श्रौत पूर्ववत् स्थापन करण्याची आज्ञा व्हावी." ह्यानंतर हें प्रकरण १७४२ पासून १७४६ पर्यंत कोणत्यानाकोणत्या निमित्तानें पेशव्यांच्या अधिकाऱ्यांनीं लांबणीवर टाकिलें होतें. शेवटीं तुकंभट्टांनीं फारच तगादा लावल्यामुळें नानासाहेबांनीं हें प्रकरण क्षेत्रस्थ ब्राह्मणांकडे निकालाकरितां सोंपविलें व तुकंभट्टांस नाशीक त्रिंबक येथील क्षेत्रस्थ ब्राह्मणांकडून संमतिपत्र आणावें अशी ताकीद दिली. त्याप्रमाणें शके १६६८ (सन १७४६) सालीं दिनकर भट्ट उपासनी त्र्यंबककर, त्र्यंबकभट्ट खेडकर, रघुनाथभट्ट हिंगणे, दिनकरभट्ट पराडकर, हरीदीक्षीत पटवर्धन प्रभृति अठ्ठावन धर्मशास्त्रकोविद ब्राह्मणांनीं दिलेलें संस्कृतांत लिहिलेलें संमतिपत्र तुकंभट्ट जावळे, पळशीकर, ह्यांनीं पेशव्यांच्या दरबारीं सादर केलें. त्या संमतिपत्रान्वयें श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे ह्यांनीं तुकंभट्टांतर्फे आज्ञापत्र काढिलें. हें अस्सल आज्ञापत्र आमच्या संग्रहीं असून तें समग्र आम्हीं खालीं नमूद करीत आहों:—

॥ श्री ॥

आज्ञापत्र राजश्री बाळाजी बाजीराव प्रधान सु॥ समान अर्बैन मया व अलफ वे॥ राजश्री तुकमभट्ट धरमभट्ट जावळे पळशीकर प्रभृति पा॥ वसई यांस तुम्हीं हुजूर आज्ञेप्रमाणें श्रीक्षेत्र नाशीक व त्रिंबक येथील पाठविलेलें समतीपत्र पाहतां **तुम्हीं यजुशाखीय ब्राह्मण** तुमचा श्रौताग्नी राजश्री गोविंदभट जोगळेकर व महादाजीपंत फडणीस वसईकर यांनीं विच्छिन्न करून तुम्हांस अग्नीहोत्राचा अधिकार नाहीं हें त्यांचें म्हणणें निराधार आहे असें जाणोन तुम्हीं पूर्वापार प्रमाणें वहिवाट चालवीत जाणें. वसईकरांनीं तुम्हांस उपसर्ग करूं नये म्हणोन त्यांस ताकीद केली आहे छ ९ मोहरम आज्ञाप्रमाण.

लेखनसीमा.

ह्या पत्रावरून असें सिद्ध होतें कीं वसई प्रांतांतील यजुर्वेदीय ब्राह्मणांस सन १७४६ पर्यंत पळशे अशी जातिवाचक संज्ञा मुळींच नव्हती. व तुकंभट्टांस जावळे, पळशीकर, यजुशाखीय ब्राह्मण असें नानासाहेबांनीं आपल्या आज्ञापत्रांत लिहिलें आहे. ह्याचा अर्थ असा कीं जावळे हें तुकंभट्टांचें उपनांव असून पळशीकर हें ग्रामवाचक नांव होतें. ह्या ग्रामवाचक (पळशीकर) आडनांवाचे ब्राह्मण कोंकणस्थांतही आढळतात व सन १९०९ ह्या वर्षीं ह्याच कुटुंबांतील एक इसम म्हणजे सखाराम अमृत पळशीकर हे नाशीक येथें मामलतदारीच्या हुद्यावर होते. म्हणून अर्थात् पळशीकर अगर

पळंशे हे शब्द जातिवाचक नाहींत असें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. आतां हा शब्द पुढें प्रचारांत कसा व केव्हां आला ह्याचा विचार आपण करूं. वर दर्शविल्याप्रमाणें नानासाहेबांनीं आज्ञापत्र प्रसिद्ध करून तुकंभट्टांचें अग्निहोत्र पूर्ववत् चालविण्यास संमति दिली व त्यांस वसईकरांनीं उपसर्ग करूं नये म्हणून त्यांस ताकीदही दिली; तथापि वसईप्रांतस्थ कोंकणस्थ, तुकंभट व त्यांचे अनुयायी ह्यांचा निष्कारण द्वेष करूं लागले व पुढें त्यांस पळशीकर, पळशे ह्या निंदाव्यंजक नांवानें संबोधूं लागले. ह्या त्यांच्या छळास व त्रासास कंटाळून तुकंभट्ट व त्यांचे कांहीं अनुयायी वसईप्रांत सोडून मुंबई, दादर येथें येऊन इंग्रजांच्या आश्रयाखालीं राहिले. ह्या तुकंभट्टांच्या घराण्यांतील वंशज मुंबई, दादर येथें विद्यमान असून त्यांतील प्रमुख डॉ. मोरेश्वर चिंतामण जावळे व रा. रा. पुरुषोत्तम मदनभट्ट जावळे, पळशीकर, हे होत. आमच्या एका मित्रापाशीं असलेल्या पेशव्यांच्या सन १७४८ सालच्या आणखी दोन लेखां-वरून असें दिसून येतें कीं त्या सालापर्यंत पळशे हें नांव प्रचारांत नसून तें साष्टी प्रांतांतील यजुःशाखीय ब्राह्मणांसही लाविलें जात नसे. ह्या दोन लेखांपैकीं एकांत म्हणजे सन १७४८ सालीं पेशव्यांनीं रामभट्ट व नागेशभट्ट क्षीरसागर (उपाध्ये) ह्यांस जोशी व उपाध्येपणा चालविण्याविषयीं दिलेल्या सनदेंत पळशे ह्या नांवाचा मुळींच उल्लेख नाहीं. आतां दुसरी सनद तुकंभट्टांचे जे अनुयायी भयानें वसईहून परागंदा होऊन मुंबईस गेले होते त्यांस सन १७४८ सालीं पुण्यास पेशव्यांच्या दरबारीं हजर झाले असतां

दिली आहे. त्या संधीस मात्र ते तुकंभट्टांचे अनुयायी असल्यामुळें पळशे हें नांव लावलें आहे.

ह्याप्रमाणें जरी वसई प्रांतांतील कांहीं भागांत तुकंभट्ट पळशीकरांच्या अनुयायांस तुकंभट्टांचे चित्पावन प्रतिस्पर्धी पळशे ह्या नांवानें संबोधीत होते, तथापि सन १७६१ पर्यंत अन्यत्र व विशेषतः मुंबई शहरांतील यजुर्वेदी ब्राह्मणांस अनुलक्षून हा शब्द रूढ झाला नव्हता व ही गोष्ट एडवर्ड्स साहेबांच्या बाँबे सिटी ग्याझेटिअरमध्यें सन १७६१ सालच्या मुंबई शहरांतील रहिवाशांच्या जातवार नोंदींचे जे दोन सरकारी तक्ते* प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून सिद्ध होतें. ह्या तक्त्यांतील कांहीं भाग खालीं नमूद करतों:-

सन १७६१.	सन १७८०.
ऋग्वेदी ब्राम्हण.	ऋग्वेदी ब्राम्हण.
गुजराथी ब्राम्हण.	गुजराथी ब्राम्हण.
यजुर्वेदी ब्राम्हण.	पळशे ब्राम्हण.
+ + +	+ + +
+ + +	+ + +

वरील तक्त्यांवरून असें दिसून येईल कीं ज्या ब्राह्मणांस सन १७६१ च्या जातवार नोंदींत यजुर्वेदी ब्राह्मण असें म्हटलें आहे

* परिशिष्ट D पहा.

त्यांसच सन १७८० च्या जातवार नोंदींत पळशे ब्राह्मण अशी संज्ञा दिली आहे. ह्याचें कारण काय? काय, अवघ्या एकुणीस वर्षांत मुंबईंतील सर्व यजुर्वेदी ब्राह्मण नाहींसे किंवा गुप्त झाले आणि त्यांच्या जागीं पळशे ब्राह्मण नांवाची नवीन जात अकस्मात् निर्माण झाली? नव्हे, ह्या दोन जातवार नोंदींतील फरकाचा खरा अर्थ किंवा कारण असें दिसतें कीं सन १७६० पासून सन १७८० पर्यंतच्या वीस वर्षांच्या अवधींत मुंबई शहराची लोकवस्ती फार वाढली; म्हणजे सन १७६० सालीं जी फक्त ६०००० (साठ हजार) होती ती सन १७८० सालीं ११३७२६ झाली. ह्या मुदतींत अनेक स्थानांहून भिन्न भिन्न जातींचे लोक मुंबईंत येऊन राहिले व त्यांत तुकंभट्टांचे प्रतिस्पर्धी जे चित्पावन ब्राह्मण तेही बरेच होते. ह्यांची नोंद सन १७८० च्या जातवार नोंदींत चित्ति (चित्पावन) अशा नांवानें झालेली आहे; आणि ह्या वेळेपासूनच मुंबई शहरांतील तुकंभट्टांचे जातभाई, म्हणजे यजुर्वेदी ब्राह्मण ह्यांच्यासंबंधानें पळशे, पळशीकर ह्या संज्ञा प्रचारांत आल्या.

वरील विवेचनावरून असें निर्विवाद सिद्ध होतें कीं, पळशे अगर पळशीकर ही संज्ञा जातिवाचक नसून स्थलवाचक आहे आणि ती संज्ञा उत्तर कोंकणांतील यजुर्वेदी ब्राह्मणांस तुकंभट्ट पळशीकर ह्यांच्या अग्निहोत्राच्या बखेड्यापासून (सन १७४६ पासून) तुकंभट्टांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं द्वेषबुद्धीनें दिली व कालांतरानें ती अन्यत्रही प्रचारांत आली.

उत्तर कोंकणाच्या संक्षिप्त इतिहासावरील आमचा हा उपोद्घातात्मक लेख संपविण्यापूर्वी उत्तर कोंकणाच्या इतिहासावर थोडाबहुत नवीन प्रकाश पडेल अशा प्रकारचें जें एक १०० पृष्ठांचें पुस्तक ११० पृष्ठांची प्रस्तावना लिहून महिकावतीची बखर ह्या नांवाखालीं श्रीयुत विश्वनाथ काशीनाथ राजवाडे ह्यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं प्रसिद्ध केलें आहे, त्यांतील विषय उत्तर कोंकणाच्या व त्यांतील प्राचीन रहिवाशांच्या इतिहासास अनुलक्षून असल्यामुळें, त्यांतील कांहीं भागांचा आपण विचार करूं.

आपल्या प्रस्तावनेंत श्री. राजवाडे म्हणतात कीं ह्या बखरीची एकच प्रत उपलब्ध आहे; परंतु हें म्हणणें यथार्थ नाहीं. आमच्या संग्रहीं आज वीस पंचवीस वर्षें ह्या बखरीची एक प्रत असून दुसरी एक प्रत ख्रिस्तवासी जाकसन साहेबांपाशींही होती व जाकसनसाहेबांनीं त्या बखरींतून घेतलेली टिपणें (Notes) सन १९११ सालीं प्रो. भांडारकर ह्यांनीं आम्हांकडे पाठविलीं होतीं हें पूर्वीं सांगितलेंच आहे. परंतु ह्यांतील बराच भाग अविश्वसनीय व निराधार आहे असें जाकसनसाहेबांचें मत असल्याचेंही आम्ही ह्या प्रस्तावनेंत पूर्वीं दर्शविलें आहे. असें असल्यामुळें ही बखर समग्र छापण्याच्या भरीस आम्हीं पडलों नाहीं. तेव्हां ही बखर नवीनच प्रकाशांत आणली असें जें जनतेस श्री. राजवाडे सांगतात तें यथार्थ नाहीं. इतकें मात्र खरें, कीं ही बखर छापून प्रकाशांत आणल्यामुळें उत्तर कोंकणस्थ यजुर्वेदी ब्राह्मण, ज्यांस श्री. राजवाडे

व त्यांचे जातभाई पळशे अगर पळशीकर ह्या नांवानें संबोधितात ते पैठण व देवगिरी ह्या प्रांतांतून भीम (बिंब) ह्यांच्या समागमें उत्तर कोंकणांत आले असें सिद्ध होतें. श्री. राजवाडे ह्यांनीं आणखी थोडे श्रम घेतले असते तर त्यांस आमच्या व आमच्या कांहीं मित्रांच्या संग्रहीं असलेले कोंकणाच्या व तेथील रहिवाशांच्या इतिहासावर प्रकाश पाडणारे कागदपत्र पहावयास मिळाले असते व त्यांच्या वाचनानें त्यांची प्रस्तावना विशेष बोधप्रद व सत्यास अनुसरून अशी झाली असती. त्याचप्रमाणें. श्री. राजवाडे ह्यांच्या महिकावतीच्या बखरींत पैठणकर, कावळे, सांवखेडकर (श्यामक्षेत्रकर) नाईक (सांडोरे), आचार्य, छत्रे. पंडित इत्यादि ज्या उत्तर कोंकणस्थ ब्राह्मणांच्या पूर्वजांचा उल्लेख आढळतो त्यांच्या संबंधानेंही श्री. राजवाड्यांस सविस्तर व विश्वासार्ह अशी माहिती मिळाली असती. केशवाचार्य हे बखरींतील मुख्य लेखक असें श्री. राजवाडे मानितात; परंतु ते कोण होते व त्यांचे वंशज हल्लीं हयात असल्यास ते कोठें रहातात ह्यासंबंधीं त्यांनीं शोध केलेला दिसत नाहीं. केशवाचार्य हे माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मण असून त्यांचे वंशज हल्लीं त्याच प्रांतांत म्हणजे साष्टी प्रांतांतील चेंबूर–वाढवली ह्या गांवीं हयात असून तेथील रहिवाशांत अद्यापि प्रतिष्ठित असे गणले जात आहेत. आतां कावळे, ह्यांस एका ठिकाणीं श्री. राजवाडे ह्यांनीं कांबळे असें लिहिलें आहे, तरी ते कोण आहेत हें पाहूं. ह्या कावळ्यांचे वंशज मालाड प्रांतांतील रहिवासी आहेत. त्यांतील बाबा भाऊ कावळे हे आमचे आप्त

असून वीस वर्षांपूर्वी मालाड प्रांतीं समाधिस्थ झाले. त्यांच्यापाशीं असलेले संस्कृत, मराठी, पर्शियन, पोर्तुगीज व इंग्रजी ह्या भाषांत लिहिलेले जुने महत्त्वाचे व ज्यांच्या योगानें इतिहासावर प्रकाश पडेल असे लेख व कागदपत्रें हीं आमच्यापाशीं आहेत. ह्या सर्व लेखांत त्यांच्या पूर्वजांस पैठणकर ब्राह्मण अशीच संज्ञा असून त्यांच्यासंबंधानें पळशे अगर पळशीकर असा शब्द कोठेंच लावण्यांत आलेला नाहीं, व बाजीराव बल्लाळ, चिमणाजी आप्पा वगैरे पेशव्यांनीं त्यांच्या पूर्वजांस म्हणजे अंताजी रघुनाथ यांस आदरपूर्वक स्वामी गोसावी असें संबोधन लिहिलें आहे. अच्युत नाईक, गंगाधर नाईक सांडोरे, सांवखेडकर, ह्यांचे वंशजही हल्लीं मुंबईस रहातात; त्यांच्यापाशीही कांहीं जुने लेख आहेत. छत्रे उपनांवहीं श्री. राजवाडे ह्यांच्या महिकावतीच्या बखरींत आढळतें आणि त्यांचेही वंशज हल्लीं मुंबई शहरांत वंशपरंपरागत वृत्त्यंशी किंवा उपाध्यायपणाचा धंदा करीत आहेत.

श्री. राजवाडे ह्यांच्या बखरींत, प्रस्तावना पृष्ठ ७० मध्यें निराधार व विसंगत अशी बरीच विधानें आढळतात. त्यांपैकीं कांहींचा आपण विचार करूं. रामदेवासंबंधानें लिहितांना ते म्हणतात हा राजा अधर्मी व अनाचारी असल्यामुळें त्याच्या हातून ब्रम्हहत्येचें पातक घडलें. हा अपूर्व शोध श्री. राजवाड्यांस कोठून प्राप्त झाला ह्याचें आम्हांस आश्चर्य वाटतें. कदाचित् श्री. राजवाडे म्हणतील कीं ही माहिती मला बखरींतून मिळाली. आम्हीं सर्व बखर चाळून

पाहिली, परंतु रामदेवाच्या हातून ब्रह्महत्या घडली व रामदेव "अधर्मी व अनाचारी" होता असा उल्लेख आह्मांस बखरींत कोठेंच आढळला नाहीं. राजवाड्यांच्या महिकावतीच्या बखरींत पृष्ठ ८१ वर पुढील शब्द आढळतातः—

ब्रह्महत्यीं गेली ब्रह्मशक्ती । रुद्रशक्तीही गेली सहज स्थिती ॥
म्लेंच्छ अवतरले क्षिती । महाअधम ॥
तों तंव राज्य करी रामचंद्र । जो क्षेत्री वंशीं दिनकर ॥
तेथें अशुभ पावलें थोर । ब्रह्महत्येचें ॥

ह्यांत रामदेव नृपतीनें ब्रह्महत्या केली असा उल्लेख मुळींच नसून उलटपक्षीं रामदेवास क्षेत्री वंशीं दिनकर म्हणजे क्षत्रिय वंशांतील सूर्यनारायण अशी बहुमानाची संज्ञा दिली आहे. ज्ञानेश्वरीचे कर्ते ज्ञानदेव हे तर खरोखरच सत्यनिष्ठ होते हें कोणीही कबूल करील. म्हणून, ज्ञानदेव हे आपल्या ज्ञानेश्वरींत रामदेवाविषयीं काय म्हणतात तें पाहूं. ते आपल्या भावार्थदीपिकेच्या शेवटीं म्हणतातः—

ऐसें युगीं परी कळीं । आणि महाराष्ट्र मंडळीं ॥
श्री गोदावरीच्या कूलीं । दक्षिणलिंगीं ॥

× × ×

तेथ यदुवंशविलासु । जो सकळ कळा निवासु ॥
न्यायातें पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र ॥

श्रीज्ञानेश्वरासारख्या परमपूज्य व निखिल महाराष्ट्रसंतजनांच्या अग्रस्थानीं शोभण्यास योग्य अशा सत्पुरुषानें ज्या नृपतीस यदुवंशविलासु, न्यायातें पोषी क्षितीशु असें आदरपूर्वक संबोधिलें आहे त्या देवगिरीच्या प्रौढप्रताप चक्रवर्ती रामदेव नृपतीस महिकावतीच्या बखरीसारख्या एका सत्यासत्यमिश्रित चोपड्याच्या संपादकानें धर्मभ्रष्ट ठरवावें आणि त्याची निर्भर्त्सना करावी ह्याचें आम्हांस सखेदाश्चर्य वाटतें. रामदेव दुष्ट अगर अधर्मी होता ही अपूर्व माहिती श्री. राजवाड्यांस ठाण्याच्या एखाद्या मानभावी पंथाच्या चोपडयांतून तर मिळाली नाहींना? तें कसेंही असो; इतकी गोष्ट खरी कीं दुराग्रही व मतलबी जन कधीं कधीं कांचेला हिरा बनवितात आणि खऱ्या हिऱ्यास कांच ठरवितात. परंतु क्रयविक्रयाचा समय आला व परीक्षक जवळ असला म्हणजे 'काचःकाचो मणिर्मणिः' असाच निर्णय ठरतो.

दुसरा मुद्दा मगध देश व तेथील रहिवासी ह्यांच्या संबंधानें आहे. आपणास "क्षितिपावन" म्हणविणारे श्री. राजवाडे पूर्वोक्त बखरीच्या प्रस्तावनेंत पृष्ठ ७० वर म्हणतात "पळशे ब्राह्मण म्हणजे पलाशी ब्राह्मण. पलाश म्हणजे मगध देश. तो मूळचा देश ज्यांचा ते पलाशी ब्राह्मण म्हणून महाराष्ट्रांत प्रख्या पावले." महिकावतीच्या मूळ बखरींत पळशे, पलाशी किंवा पळशीकर असे जातिवाचक किंवा अन्यार्थसूचक शब्द कोठेंही आढळत नाहींत. मग प्रस्तावना लिहितेवेळीं श्री. राजवाडयांच्या

मेंदूंत वरील निंदाव्यंजक शब्दांचा शिरकाव कसा झाला ? हल्लींच्या बहार प्रांताच्या दक्षिण भागास मगध अशी संज्ञा होती.* मगधाच्या पूर्ववैभवासंबंधानें पाश्चात्य व पौरस्त्य विद्वानांनीं अनेक लेख लिहिलेले आहेत; परंतु त्यांत कोणत्याही रहिवाश्यांस किंवा कोणत्याही ब्राह्मणांस पलाश. पलाशी अगर पळशे असें म्हटलेलें आढळत नाहीं. कालिदासाच्या रघुवंशांत परंतपाचें वर्णन करितांना कवि म्हणतात "असौ शरण्यः शरणोन्मुखानामगाधसत्वो मगधप्रतिष्ठः ॥" त्याचप्रमाणें दंडीच्या दशकुमारचरित्रांत मगधाचा उल्लेख "अस्ति मगधेषु पुष्पपुरी नाम नगरी" असा केला आहे, पलाश देश असा केला नाहीं. कारण, मगधाचें पलाश हें नांव गौण असून लोकविश्रुत नव्हतें. उलटपक्षीं मगध देशांतील लोकांस मागधाः व तेथील भाषेस मागधी असें म्हणतात हें श्री. राजवाड्यांस माहीत

*ऋग्वेदांत मगधाचा उल्लेख सांपडत नाहीं. शुक्लयजुर्वेदसंहिता, ३०.५.२२ येथें पुरुषमेधासंबंधानें मगधाचा उल्लेख आला असून, पंचविंश ब्राह्मणामध्यें मागधांची संस्कृति आर्यसंस्कृतीपासून भिन्न होती असें दर्शविलें आहे. पण पुढें उत्तरोत्तर म्हणजे पौराणिक काळीं व त्यानंतर मगधदेशाचें वैभव वाढत्या प्रमाणावर जाऊन एकाकाळीं मगधदेश वैभवाच्या शिखरास चढला होता हें विसरतां कामा नये. उदाहरणार्थ, जैनधर्म आणि बौद्धधर्म यांचे संस्थापक महावीर आणि गौतमबुद्ध यांच्या धर्मविषयक कार्याचें केंद्रस्थान मगधदेशच होतें. त्याप्रमाणेंच, पाणिनि आणि पतंजलि, वररुचि आणि पिंगल हेही मगधदेशांतच उदयास आले. तसेंच भरतखंडांतील प्राचीन आणि विख्यात विश्वविद्यालयें नालंदा आणि विक्रमशीला यांचें अस्तित्व मगधदेशांत असल्यामुळें मगधदेशाची कीर्ति सर्वत्र पसरली होती.—R. P. J.

नसावें ह्याचें आम्हांस आश्चर्य वाटतें. बरें, ज्यांस श्री. राजवाडे अज्ञानानें अगर पूर्वविरोधदृष्टीनें पळशे असें म्हणतात ते मगध-देशाचे रहिवासी होते व ते आणि पैठणप्रभू हे देवगिरीस मगध देशांतून आले ही अपूर्व माहिती श्री. राजवाड्यांस कोठून मिळाली? पळशे म्हटले जाणारे ब्राह्मण व पैठणप्रभू हे मगध देशांतून आल्याचा उल्लेख राजवाड्यांच्या महिकावतीच्या बखरींतील मूळ लेखांत कोठेंच आढळत नाहीं. सारांश, कोणत्यातरी निमित्तानें श्री. राजवाड्यांस उत्तर कोंकणस्थ माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मणांस पळशे, पलाशी अशीं निंदाव्यंजक विशेषणें देऊन त्यांची अवहेलना करावयाची होती असा त्या समाजांत समज झाल्यास तो चुकीचा ठरणार नाहीं. मगधांतील इतर रहिवासीही देवगिरीस व अन्यत्र निरनिराळ्या काळीं गेले असें असतां त्या जातींस किंवा तेथील इतर ब्राम्हणांस पळशे अगर पलाशी अशी अभिधा दिलेली कोठेंही आढळत नाहीं. मग ती श्री. राजवाड्यांच्या काल्पनिक कोशांत किंवा मान-भावी बाडांत सांपडली असली तर न कळे! खरा इतिहास असा आहे कीं माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मण मूळचे विदेहांतील. विदेहाचा राजा जनक ह्याच्या दरबारीं योगीश्वर याज्ञवल्क्य हे प्रमुख धर्मोपदेशक होते. ह्या याज्ञवल्क्यांनींच शुक्ल यजुर्वेदाच्या १५ शाखा स्थापिल्या असें उपनिषदें व इतिहासपुराणें सांगत असतां महिकावतीच्या चोपड्याच्या संपादकानें तिकडे दुर्लक्ष करावें ही गोष्ट स्वतःस

क्षितिपावन ' म्हणविणाऱ्या व संशोधकाग्रणी समजणाऱ्या संपाद-

कास लज्जास्पद होय. पळशे ही संज्ञा पळशीकर ह्या ग्रामवाचक नांवावरून निघाली असून ती विद्वान् अग्निहोत्री तुकंभट्ट जावळे. पळशीकर, ह्यांच्या अग्निहोत्राच्या बखेड्यानंतर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं ह्मणजे श्री. राजवाड्यांच्या वसईंतील जातभाईनीं प्रथमतः प्रचारांत आणली असें आम्हीं ह्या लेखाच्या पूर्वभागीं दर्शविलें आहेच. तेव्हां, त्याची पुनरुक्ति करण्याची आवश्यकता दिसत नाहीं. ह्या विवेचनावरून श्री. राजवाड्यांचें व त्यांच्या इतर जातभाईंचें शंकानिरसन होऊन ते पुन्हां कुत्सित लेख लिहून उत्तर कोकणांतील माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मणांची मनें ह्यापुढें तरी दुखविणार नाहींत अशी आम्हीं आशा करितों. तसें न झाल्यास,

'**अकारणद्रोहपरो नरो भवेत् स्वयं विधातापि न तं प्रशाम्यति॥**'

म्हणजे कारण नसतां जर कोणी द्रोह करूं लागला तर प्रत्यक्ष ब्रह्मदेवासही त्याची समजूत करितां येणार नाहीं या वचनाची प्रतीति येईल.

तिसरा मुद्दा पैठणप्रभूंच्यासंबंधानें आहे. प्रभू म्हटला म्हणजे तो चांद्रसेनीय असो कीं पैठणस्थ असो, श्री. राजवाड्यांस फारसा आवडत नाहीं असें त्यांच्या अनेक लेखांवरून दिसतें. उत्तर कोंकणस्थ यजुर्वेदी ब्राम्हणांप्रमाणेंच ह्या इतिहासबहादुरांची प्रभु समाजावरही कृपादृष्टि नाहीं, म्हणून त्याच्या संबंधानेंही श्री. राजवाड्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत विचित्र विधानें केलीं आहेत. पैठणप्रभूंस श्री. राजवाडे प्रत्येनस् अगर रखवालदार असें म्हणतात व ह्याच्या

समर्थनार्थ याज्ञवल्क्यांच्या बृहदारण्यकोपनिषदाच्या चौथ्या अध्यायाच्या तृतीय ब्राम्हणांतील पुढील उतारा देतातः——

"यथा राजानमायान्तमुग्राः प्रत्येनसः × ×".

व ह्यांतील प्रत्येनस् ह्या शब्दाचा अर्थ श्री. राजवाडे वर सांगितल्याप्रमाणें रखवालदार अगर पोलिस शिपाई असा करतात; परंतु श्री. राजवाड्यांस आम्हीं असें विचारितों कीं इतर क्षत्रिय जाती त्या काळीं पूर्वोक्त देशांत अस्तित्वांत नव्हत्या काय? आणि असल्यास सर्व क्षत्रिय जातीच्या पोलिस शिपायांस अगर रखवालदारांस प्रत्येनस् म्हणजे पातेणे असें नांव कां देण्यांत आलें नाहीं? आणि पैठण प्रभूंच्याच कपाळीं ह्या क्षुद्र अभिधेच्या अक्षता श्री. राजवाड्यांनीं कां लावाव्या? पैठण प्रभूंस पाठारेप्रभू असेंही म्हणतात. ही गोष्ट खरी आहे; परंतु पाठारे हें नांव क्षुद्र धंदा करणाऱ्या जातीचें सूचक नसून ती संज्ञा एका काळीं कान्यकुब्ज येथील राजाधिराजांस लावीत असत. ह्याचें ऐतिहासिक दृष्ट्या दिग्दर्शन व पाठारे शब्दाची व्युत्पत्ति आम्हीं आमच्या History of the Pathare Prabhus ह्या पुस्तकांत दिली आहे ती श्री. राजवाडे ह्यांनीं पाहिली नसेल असें नाहीं. प्रतिहारी किंवा परिहार ह्या वंशाचे राजे कनोजचे सम्राट् असून पाठारे हा शब्द प्रतिहारी ह्या शब्दापासून कसा निघाला हें आम्हीं वरील पुस्तकांत पृष्ठ १०।११ वर पुढें लिहिल्याप्रमाणें दाखविलें आहे:——

"I am of opinion that the word Pathare is a tribal name and that it is derived from the name Pratihari (Pratihara or Pratihari = Padihar or Patihâr = Pathârâ or Pâthari)".

पाठारे ह्या शब्दाची आम्हीं दिलेली वरील व्युत्पत्तीच श्री. राजवाडे ह्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत दिली आहे. परंतु त्याच ठिकाणीं प्रतिहारी हे कनोजचे प्रख्यात सार्वभौम होते व पाठारे हा शब्द कान्यकुब्ज देशाच्या सार्वभौमांचा द्योतक आहे असें जें आम्हीं लिहिलें आहे त्याचा मात्र श्री राजवाड्यांस विसर पडावा हें विचित्र होय!

चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंवरही श्री. राजवाड्यांची कृपादृष्टी नाहीं असे आमचे कांहीं कायस्थ मित्र नेहमीं म्हणत असतात; आणि ह्यामुळेंच कदाचित श्री. राजवाड्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत कांहीं कारण नसतां चांद्रसेनीय प्रभू समाजाचा संबंध जोडून दिला आहे. प्रस्तावना पृष्ठ ५३ वर श्री. राजवाडे म्हणतात, "इतर जातींच्या कायस्थांपासून स्वतःस विशेषिण्याची अपेक्षा जेव्हां प्रभु कायस्थांस भासूं लागली तेव्हां त्यांनीं आपल्या नांवापाठीमागें दुसरें एक विशेषण जोडलें. तें विशेषण चांद्रसेनीय हें होय." असें लिहून पुढें श्री. राजवाडे असा सिद्धांत काढतात कीं हा चंद्रसेन म्हणजे शिलाहार वंशांतील शेवटला राजा सोमेश्वर होय. व सोम म्हणजे चंद्र आणि ईश्वर म्हणजे राजा किंवा सेन म्हणून सोमेश्वर शब्दापासून चंद्रसेन हा शब्द श्री. राजवाडे ह्यांनीं आपल्या तर्कबुद्धीनें

निर्माण केला. ह्या विचित्र व्युत्पत्तीबद्दल श्री. राजवाड्यांची तारीफ करावी किंवा ही त्यांची कृति परशुरामाचे शिष्य आणि कार्तवीर्याचे वंशज ह्यांच्यामधील गतकालच्या वैमनस्याची द्योतक आहे ह्याची मीमांसा करण्याचें काम आम्हीं आमच्या चाणाक्ष वाचकांकडे सोंपवितों.

हल्लींचा मनु परस्परांच्या उखाळ्यापाखाळ्या काढून जातिद्वेष वाढविण्याचा नसून सर्व हिंदु समाजांत ऐक्य वाढवून तेणेंकरून राष्ट्रोन्नति करण्याचा आहे ह्याची श्री. राजवाड्यांसारख्या विद्वान् इतिहाससंशोधकास विस्मृति पडावी ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. आमच्या चित्पावन बांधवांविषयीं आमच्या अंतःकरणांत पूर्ण प्रेम वसत आहे आणि ज्या समाजांत न्यायमूर्ति रानडे, देशभक्त गोखले आणि लोकमान्य टिळक ह्यांच्यासारखे खरे चित्तपावन म्हणजे पवित्र अंतःकरणाचे सत्पुरुष निर्माण झाले आणि ज्या समाजांत श्री. चिंतामणराव वैद्यांसारखीं सत्पथानुगामी विद्वरत्नें हल्लीं चमकत आहेत तो समाज महाराष्ट्रांत आदरणीय नाहीं असें कोण म्हणेल ?

हा उत्तर कोंकणाच्या इतिहासाचा लेख डॉ. केतकर ह्यांच्या ज्ञानकोशाकरितां लिहिला गेला असल्यामुळें इंग्रजी अमदानींतील म्हणजे उत्तर कोंकणप्रांत इंग्रजांच्या ताब्यांत आला त्या काळापर्यंतचाच आहे आणि तो येथें संक्षिप्तरूपानें दिला आहे.

प्रस्तुत पुस्तक तयार करीत असतां लेखनाचें व संशोधनाचें काम चि. रामराव ह्यांनीं आपल्या बी. ए. च्या परीक्षेचा अभ्यास

संभाळून मोठ्या औत्सुक्यानें केलें. तसेंच, आमचे मित्र **श्री. हरी महादेव आचार्य** व **श्री. आत्माराम वामन पारायणे** ह्यांनीं, ही प्रस्तावना लिहीत असतांना लेखनाचें व वाचनाचें काम पत्करून उपयुक्त माहिती मिळविण्याच्या कामीं साहाय्य केलें त्याबद्दल ग्रंथकार त्यांचा आभारी आहे. श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे ह्यांचें अस्सल आज्ञापत्र परिशिष्टांत दिलें आहे, तें मिळविण्याच्या कामीं आमचे विद्वान् मित्र **डॉ. दीनानाथ बाळकृष्ण नाईक दांडेकर** ह्यांनीं जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचाही ग्रंथकार आभारी आहे.

पु. बा. जोशी.

उत्तर कोंकणाचा प्राचीन इतिहास.

प्रकरण पहिलें.

प्राचीन हिंदु राजसत्ता.

कोंकण प्रांताचा इतिहास म्हटला म्हणजे विशेषतः उत्तर कोंकणाचा इतिहास होय; कारण ऐतिहासिक दृष्ट्या दक्षिण कोंकणास विशेष महत्त्व नाहीं. आपल्या प्राचीन वाङ्मयांत कोंकण प्रांतास " अपरांत " किंवा "अपरांतक" असें नांव दिलेलें आढळतें. महाभारत शांतिपर्व, अ. ४९, श्लोक ६७ त अपरांताचा पुढीलप्रमाणें उल्लेख आहे, " ततः शूर्पारकं देशं सागरस्तस्य निर्ममे। सहसा जामदग्न्यस्य सोऽपरांतमहीतलम् ॥ " ह्याचा अर्थ असा कीं, त्यानंतर सागरानें परशुरामासाठीं शूर्पारक देश निर्माण केला; हा देश अपरांताचा एक भाग होय. सभापर्वामध्येंही शूर्पारकाचा उल्लेख सांपडतो. सभापर्व, अ. ३१, श्लो. ६५–७० ह्यांत सहदेवानें जिंकलेल्या प्रांतांचें वर्णन असून भोजकोटाच्या रुक्मी राजास जिंकून अपार संपत्ति मिळविल्यावर सहदेवानें शूर्पारक आणि तालाकट हे प्रदेश पादाक्रांत केले असें म्हटलें आहे.* येथें

---

* ततः स रत्नान्यादाय पुनः प्रायाद् युधांपतिः।
ततः शूर्पारकं चैव तालाकटमथापिच ॥–म. भा; सभाप. ३१.६५–७०.

कोंकण ह्या नांवाचा किंवा देशाचा उल्लेख नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कारण शांतिपर्वांतील उल्लेखावरून असें निर्विवाद ठरतें कीं शूर्पारक, " अपरांतमहीतलम् " म्हणजे अपरांताचा एक भाग किंवा मुख्य शहर होतें. कित्येक विद्वानांचें असें म्हणणें आहे कीं भीष्मपर्वांत कोंकणाचा उल्लेख आहे. परंतु, श्री. दत्तशास्त्री, एम्. ए. यांनीं कलकत्ता येथें छापलेल्या महाभारताच्या प्रतींत भीष्मपर्वामध्यें अपरांत देशाचें नांव असून कोंकण हा शब्द आढळत नाहीं. ह्यावरून असें दिसतें कीं, महाभारतकाळीं उत्तर कोंकण, बनवासी व गोमांतकाचा प्रदेश ह्यांस अपरांत अशी संज्ञा होती. भीष्मपर्वाच्या इतर प्रतींत कोंकण शब्द असल्यास, तो प्रक्षिप्त असावा. आदिपर्व, अ. २१८ श्लो. १ मध्यें अर्जुनाच्या तीर्थप्रवासाचें वर्णन देतांना तो अपरांताहून प्रभास येथें गेला असें म्हटलें आहे.* येथेंही कोंकण देशाचा उल्लेख नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कालिदासानें रघुवंशांत रघूच्या दिग्विजयाचें वर्णन करतांना जे देश वर्णिले आहेत त्यांत अपरांत देशाचें नांव आढळतें, कोंकणाचें नांव आढळत नाहीं. ह्यावरून असें अनुमान करतां येतें कीं कालिदासाच्या काळापर्यंत म्हणजे ख्रिस्ती शकाच्या आरंभापूर्वीं कोंकण हें नांव प्रचारांत नव्हतें. कौटिल्यानेंही आपल्या अर्थशास्त्रांत कोंकणाचा अपरांत ह्या नांवानेंच

* सोऽपरांतेषु तीर्थानि पुण्यान्यायतनानि च ।
सर्वाण्येवानुपूर्व्येण जगामामितविक्रमः ॥
समुद्रे पश्चिमे यानि तीर्थान्यायतनानि च ।
तानि सर्वाणि गत्वा स प्रभासमुपजग्मिवान् ॥ –म. भा; आदिप. २१८.१–२.

निर्देश केला आहे.[†] वरील विवेचनावरून असें दिसतें, कीं इ. स. च्या ५ व्या किंवा ६ व्या शतकानंतर अपरांतक प्रदेशास कोंकण ही संज्ञा प्राप्त झाली असावी. पाश्चात्य इतिहासकार टॉलेमी ह्यांच्या ग्रंथांत ह्या प्रांतास " ॲरियाका " असें म्हटलें आहे, व हें नांव " अपरांतक " ह्या नांवाचा अपभ्रंश होय. सौराष्ट्रांतील गिरनार, हिमालयांतील खालसी व अफगाणिस्थानांतील शहाबाज-गढी ह्या तीन ठिकाणीं सांपडलेल्या अशोकाच्या शिलालेखांवरून असें आढळतें कीं, ख्रिस्तापूर्वी तिसऱ्या शतकांत अशोकानें बौद्ध धर्माच्या प्रसारासाठीं आपले प्रेषित राष्ट्रिक (महाराष्ट्र), पेठानिक (प्रतिष्ठान) व अपरांतक (कोंकण) ह्या प्रांतांत पाठविले होते.

त्याप्रमाणेंच " महावंसो " ह्या बुद्धविषयक धर्मपुस्तकावरून असें समजतें कीं, अशोकाच्या आज्ञेवरून मौद्गलीपुत्र ह्यानें महारट्ठ (महाराष्ट्र), अपरांत व वनवासी ह्या प्रांतांत आपले धर्मप्रचारक पाठविले होते. अशोक (इ. स. पूर्वी २३४–१९८) हा मौर्य वंशांतील पाटली-पुत्राचा राजा चंद्रगुप्त ह्याचा नातू होय; व ह्यावरून ख्रिस्तापूर्वी दुसऱ्या व तिसऱ्या शतकांत अपरांत अथवा कोंकणप्रांत मौर्यांच्या

---

† कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत अपरांतासंबंधानें पुढीलप्रमाणें उल्लेख आढळतो:– " षोडशद्रोणं जांगलानां वर्षाप्रमाणमध्यर्धमानूपानां देशवामानामर्धत्रयोदशमश्मकानां त्रयोविंशतिरवंतीनामपरिमित**मपरांतानां** हैमन्यानां च कालतः ।" अधिकरण २. पा. ११५, ह्याचा अर्थ असा कीं, अश्मक (अजिंठ्याजवळील प्रदेश) आणि अवंती (उज्जयिनी) येथें अनुक्रमें १३॥ व २३ द्रोण पाऊस पडतो. परंतु अपरांतांत व हिमालयानजीकच्या प्रांतांत अपरिमित मेघवृष्टि होते.

ताब्यांत होता. वरील विधानाला आणखीही सबळ पुरावा आहे तो हा कीं, सोपारें येथें इ. स. १८८२ साली सर जेम्स कँप्बेल व पंडित भगवानलाल ह्यांनीं खोदून काढलेल्या बौद्धांच्या स्तूपामध्यें अशोकाच्या आठव्या अनुज्ञेचा कांहीं भाग आढळून आला व तेथें त्यांना गौतमीपुत्र शातकर्णी ह्याच्या नांवाचें नाणें आढळलें. ह्या सोपाऱ्याचें प्राचीन नांव शूर्पारक असून ती नगरी अशोकाची उत्तर कोंकणांतील राजधानी होती. बायबलांतील ऑफिर (Ophir) हें शहरही सोपारा किंवा शूर्पारक असावें असा कित्येक इतिहासज्ञांचा तर्क आहे.* ह्यावरून प्राचीन काळीं उत्तर कोंकणप्रांत फार विख्यात होता असें दिसतें.

ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकांत महाराष्ट्र व कोंकण या प्रांतांवर शातवाहन राजांचें आधिपत्य होतें; आणि हे शातवाहन नृपति आपल्या पुराणांत वर्णिलेले आंध्रभृत्य होत.† ह्यांच्या नाशिक

---

* ख्रिस्ती बायबलाच्या जुन्या करारांतील वर्णनावरून असें आढळून येतें कीं थर्शीसचें आरमार, सोन्याच्या ढाली, हस्तीदंती सिंहासन, मयूर आणि मसाले वगैरे वस्तु तीन वर्षांतून एकदां पश्चिमेकडील ओफीर येथून आणी व तेणेंकरून सालोमननृपतींच्या दरबारास शोभा येत असे.

† आपल्या पुराणांत ह्या शातवाहनांचें आंध्रभृत्य ह्या नांवाखालीं वर्णन आलें असून वायु पुराणांत, " आंध्रा भोक्ष्यंति वसुधां शते द्वे च शतं च वै ।" असें म्हटलें आहे. ह्याचा अर्थ असा कीं, शातवाहन किंवा आंध्रभृत्य घराण्यांतील राजे पृथ्वीवर तीनशें वर्षे राज्य करतील; आणि शातवाहनांच्या उपलब्ध झालेल्या शिलालेखांवरूनही असें सिद्ध होतें कीं, इ. स. पू. ७३ ते इ. स. २१८ पर्यंत शातवाहनांची महाराष्ट्र, अपरांत (कोंकण) इ. प्रदेशांवर राजसत्ता चालू होती.

प्रांतांतील त्रिरश्मिपर्वताच्या एका गुहेंत सांपडलेल्या शिलालेखांत असें लिहिलें आहे कीं, ह्या वंशांतील पुलुमायी राजाच्या कारकीर्दीच्या एकोणिसाव्या वर्षीं ह्याची मातामही व गोतमीपुत्र शातकर्णी ह्याची माता गोतमी बलश्री हिनें ही गुहा तयार करवून भाद्रायणी पंथाच्या भिक्षुसंघास अर्पण केली होती. हा गोतमीपुत्र शातकर्णी, राजांचा राजा असून त्याचा अंमल असिक, सुराष्ट्र, अपरांतक, विदर्भ, अनूप, आकरावन्ती इत्यादि देशांवर चालू होता. वरील लेखांत आणखीही असें लिहिलें आहे कीं, "आपल्या प्रजाजनांचीं सुखदुःखें आपलींच आहेत असें समजून त्यांस हे गोतमीपुत्र शातकर्णी समभावानें वागवितात; शक, यवन, पल्हव यांचा ह्यांनीं युद्धांत पराभव करून संहार केला आहे. त्याचप्रमाणें क्षत्रपांचें निर्मूलन करून शालीवाहन घराण्याची पुन्हा प्रतिष्ठापना केली आहे." ह्यावरून उत्तर कोंकण प्रांत इ. स. च्या पहिल्या व दुसऱ्या शतकांत शातवाहनांच्या ताब्यांत होता हें निर्विवाद ठरतें.

इसवी सनाच्या चौथ्या शतकांत कोंकण (अपरांतक) प्रांत कलचुरी घराण्यांतील राजांच्या अंमलाखालीं होता असें दिसतें; कारण ह्या घराण्यांतील राजा कृष्णराज (इ. स. ३७५–४००) नृपतीच्या वेळचीं रुप्याचीं नाणीं मुंबई व साष्टी येथें आढळून आलीं आहेत, व त्यांवरून असें अनुमान निघतें कीं, इ. स. च्या चौथ्या व पांचव्या शतकांत कोंकण प्रांत कलचुरी घराण्यांतील

राजांच्या सत्तेखालीं होता. कलचुरी घराण्यांतील राजांनीं कोंकण प्रांतावर आणखी किती वर्षें राज्य केलें ह्याबद्दल साधार माहिती मिळत नाहीं; परंतु इ. स. च्या सहाव्या शतकापर्यंत मौर्यांची कोंकण प्रांतावर सत्ता होती ह्याबद्दल सबळ पुरावा मिळतो.

चालुक्य घराण्यांतील कीर्तिवर्मन् ह्या नृपतीनें (इ. स. ५६७–५९१) उत्तर कोंकणावर स्वारी करून मौर्यांचा पराभव केला. कीर्तिवर्म्याचा मुलगा पुलकेशी (इ. स. ६११–६४०) ह्यानें कोंकण प्रांतावर स्वारी केली एवढेंच नव्हे, तर तो प्रांत जिंकून मौर्यांचें उच्चाटन केलें. पुरी हें मौर्यांच्या कोंकणांतील राजधानीचें मुख्य शहर होतें व त्यावर पुलकेशीचा सेनापति चंडदंड ह्यानें स्वारी करून तें शहर घेतलें. चालुक्य घराण्यांतील नृपतींमध्यें पुलकेशी हा, फार पराक्रमी राजा असून त्यानें माळवा, गुजराथ, कनोज व बनवाशी हे प्रांत आपल्या सत्तेखालीं आणिले होते. पुलकेशीनें पुरी व बनवाशी हीं दोन वैभवसंपन्न नगरें जिंकलीं, परंतु ह्यांपैकीं कोणतेंही शहर त्याच्या राज्याची राजधानी नसून, कान्यकुब्ज (कनोज) नगर हीच राजधानी होती. हें पुरी शहर सांप्रतचें घारापुरी किंवा त्याच्या ईशान्येस असलेलें मोरे बंदर असावें असें आमचें मत आहे. हे चालुक्य उत्तर कोंकणावर किती वर्षें राज्य करीत होते हें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं; परंतु इ.स. ८१० सालापर्यंत ते राज्य करीत असावे असें दिसतें; कारण त्या वर्षापासून कोंकण प्रांतावर शिलाहारांचा अंमल चालू झाला.

इ. स. ८१०–१२६० पर्यंत कोंकण प्रांतावर शिलाहार वंशाच्या वीस राजांनीं राज्य केलें. पुरी हें शिलाहारांच्या राजधानीचें मुख्य शहर असून त्यांच्या राज्यांतील इतर शहरांमध्यें संजाण, ठाणा, चौल, लोनाड व उरण हीं प्रमुख होतीं. शिलाहार राजे स्वतःला "तगरपुराधीश्वर" असें बिरुद लावीत व ते आपणांस जीमूतवाहनाचे वंशज म्हणवीत. शिलाहारांचा कोंकणांतील पहिला राजा कपर्दी होय; परंतु त्याच्याविषयीं विशेष माहिती उपलब्ध नाहीं. कपर्दीमागून त्याचा मुलगा पुलकेशी गादीवर बसला. ह्याच्या संबंधानें ऐतिहासिक पुरावा मिळतो. साष्टी प्रांतांतील कान्हेरी येथील एका शिलालेखांत "कोंकणांतील मंगळपुरीचा अधिपति" असें त्यानें आपणास म्हटलें आहे, आणि राष्ट्रकूटांचा राजा अमोघवर्ष ह्याचे आपण अंकित आहोंत असेंही दर्शविलें आहे. ह्यावरून राष्ट्रकूट हे शिलाहारांचे सार्वभौम होते असें दिसतें. शिलाहारांचा तिसरा राजा, दुसरा कपर्दी, व चौथा राजा वपुवण्ण हे होत. ह्यांच्याविषयीं विशेष माहिती उपलब्ध नाहीं; फक्त कान्हेरी येथें आढळलेल्या नंबर १० व ७८ च्या शिला-लेखांवरून असें समजतें कीं, दुसरा कपर्दी राजा हाही राष्ट्र-कूटांचा अंकित होता. वपुवण्णाला झांझ व गोग्गी ह्या नांवाचे दोन मुलगे होते; वपुवण्णानंतर झांझ गादीवर बसला. इ. स. ९१६ मध्यें हा झांझराजा सैमूर (चौल) प्रांतावर राज्य करीत होता असें अरब इतिहासकार मसुदी ह्यानें आपल्या इतिहासांत

लिहिलें आहे. झांझनृपानंतर त्याचा भाऊ गोग्गी गादीवर बसला व गोग्गीच्या मागून त्याचा मुलगा वज्जडदेव अपरांतकाचा राजा झाला. वज्जडदेवासंबंधानेंही फारशी माहिती मिळत नाहीं. वज्जडदेवानंतर त्याचा मुलगा अपराजित हा कोंकण (अपरांतक) प्रांताचा राजा झाला. हा शिलाहारांचा आठवा राजा होय. ह्याच्या कारकीर्दींत शिलाहारांवरील राष्ट्रकूटांचें सार्वभौमत्व नष्ट झालें, ह्याचें कारण पुढें दिलें आहे. अपराजिताच्या वेळच्या म्हणजे इ. स. ९९७ सालच्या, कांहीं वर्षांमागें भिवंडी प्रांतांतील भेरगांवीं सांपडलेल्या शिलालेखावरून असें समजतें कीं, चालुक्यांचा राजा तैलप ह्याच्या हातून राष्ट्रकूटांचा राजा कक्कल मारला गेल्यामुळें शिलाहारांवरील राष्ट्रकूटांचें स्वामित्व नाहींसें झालें.

अपराजितामागून त्याचा मुलगा वज्जडदेव (दुसरा) गादीवर बसला व त्याच्यामागून त्याचा भाऊ अरिकेसरी हा इ.स. १०१७ सालीं कोंकण प्रांताचा अधिपति झाला. इ. स. १०९७ सालच्या सांपडलेल्या शिलालेखांत अरिकेसरी हा कोंकणांतील १४०० गांवांवर राज्य करीत असून ह्या गांवांपैकीं पुरी, श्रीस्थानक (ठाणें) व संजाण हीं महत्वाचीं होतीं असें म्हटलें आहे. शिलाहारांचा सतरावा राजा मल्लिकार्जुन हा मोठा बढाईखोर असून, आपण सर्व राजांत श्रेष्ठ (राजपितामह) आहोंत असें तो मानीत असे. एकदां असें घडलें कीं, मल्लिकार्जुनाचा एक भाट गुजराथचा राजा कुमारपाल सोलंकी (इ. स. ११४३–११७४) ह्याच्या दरबारीं गेला व त्याजपुढें

त्यानें आपला राजा मल्लिकार्जुन "राजपितामह" आहे असें वर्णन केलें. ह्यामुळें कुमारपालाला राग येऊन त्यानें आपला सेनापति अंबद ह्यास कोंकण प्रांतावर स्वारी करण्यास पाठविलें. परंतु कलाविनी नदीच्या कांठीं मल्लिकार्जुनानें अंबदाचा पराभव केला. याप्रमाणें पराभव झाल्यामुळें अनहिलवाडा येथें त्यानें कुमारपालास सर्व वृत्तांत निवेदन केला. तेव्हां कुमारपालानें त्यास नवें जास्त जोमाचें सैन्य दिल्यामुळें वीरश्रीनें प्रेरित होऊन त्यानें पुन्हां मल्लिकार्जुनावर स्वारी केली, आणि त्याच्या हत्तीवर चढून त्याचा वध केला.

मल्लिकार्जुनाच्या वेळचे दोन शिलालेख उपलब्ध झाले आहेत; त्यापैकीं एक चिपळूण येथें सांपडलेला इ. स. ११५६ सालचा असून, दुसरा वसई येथील इ. स. ११६० सालचा आहे. शिलाहारांचा शेवटचा राजा सोम किंवा सोमेश्वर असून तो इ. स. १२४९ सालीं सिंहासनारूढ झाला. इ. स. १२६० ह्या वर्षी देवगिरीचा राजा महादेव ह्यानें मोठ्या सैन्यानिशीं कोंकण प्रांतावर स्वारी करून सोमेश्वराचा पराभव केला. सोमेश्वर नौकागमनशास्त्रांत प्रवीण असल्यामुळें त्यानें समुद्राचा आश्रय धरिला; परंतु महादेवानें अनेक समुद्रयानांनिशीं त्याजवर स्वारी करून त्याचा व त्याच्या सैन्याचा विध्वंस केला असें वर्णन महादेवाचा विद्वान् मंत्री हेमाद्रि ह्यानें आपल्या "राजप्रशस्तींत" दिलें आहे. कारण हेमाद्रि म्हणतातः—"सोमः समुद्रप्लवपेशलोऽपि । ममज्ज सैन्यैः सह कुङ्कुणेशः ।"

ह्याप्रमाणें इ. स. १२६० सालीं कोंकण प्रांत देवगिरीच्या **प्रौढप्रतापचक्रवर्ती यादव** नृपतींच्या साम्राज्याखालीं आला व तेव्हांपासून तो इ. स. १३१८ पर्यंत त्यांच्या सत्तेखालीं होता.

महादेवानें कोंकण प्रांतावर अंमल चालविण्याकरितां आपले प्रतिनिधि नेमिले होते. त्यांस सर्वाधिकारी किंवा महाप्रधान अशी संज्ञा होती. इ. स. १२७१ मध्यें महादेव निवर्तला व त्याच्यामागून त्याचा मुलगा रामदेव हा देवगिरीचा अर्थात् कोंकण प्रांताचाही अधिपति झाला. वर सांगितलेंच आहे कीं, कोंकण प्रांतावर अंमल चालविण्याकरितां देवगिरीच्या राजांकडून महाप्रधान (गव्हर्नर) नांवाचे अधिकारी नेमले जात असत त्याप्रमाणें डॉ. फ्लीट ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या शिलालेखावरून असें दिसून येतें कीं, इ. स. १२७२ सालीं अच्युत नायक नांवाचा यजुर्वेदी ब्राह्मण महाप्रधान अथवा गव्हर्नर ह्या नात्यानें कोंकण प्रांतावर अंमल चालवीत होता.

बाथेनसाहेबांना मिळालेल्या यादवांच्या शिलालेखावरून असें समजतें कीं, इ. स. १२९० त रामदेवाच्यातर्फे भारद्वाज गोत्रोत्पन्न कृष्ण कावळे ह्या नांवाचा ब्राह्मण महाप्रधान सर्व कोंकण प्रांतावर अंमल चालवीत होता. रामदेवराजा राज्य करीत असतांना इ. स. १२९४ सालीं दिल्लीच्या बादशहाचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी ह्यानें आठ हजार स्वारांनिशीं देवगिरीवर स्वारी केली. एवढें मोठें परचक्र अकस्मात् देवगिरीवर येईल असें रामदेवास

वाटलें नव्हतें; परंतु प्रसंग कठीण गुदरल्यामुळें त्यानें चार हजार शिपाई बरोबर घेऊन अल्लाउद्दीनाच्या सैन्यास तोंड देण्याची तयारी केली. परंतु त्याचा वडील पुत्र शंकरदेव हा कांहीं कामासाठीं शहराबाहेर दूर गेला असल्यामुळें संरक्षणासाठीं त्यानें किल्ल्याचा आश्रय धरिला. इतक्या अवधींत शंकरदेव परत येऊन त्यानें अल्लाउद्दीनाच्या सैन्यावर हल्ला केला, परंतु त्यांत त्याचा पराभव झाल्यामुळें रामदेवानें अल्लाउद्दीनाबरोबर तहाचें बोलणें लावून दिल्लीच्या बादशहास वार्षिक खंडणी देण्याचें कबूल केलें. ह्याप्रमाणें तहाचें बोलणें चालू असतां रामदेवानें सुरक्षितपणासाठीं व वंशरक्षणासाठीं आपला दुसरा मुलगा भीमदेव (बिंबदेव) ह्याजबरोबर राजगुरु पुरुषोत्तमपंत कावळे व इतर उमराव देऊन त्यास उत्तर कोंकणांत पाठविलें. उत्तर कोंकणांत ह्या वेळेस रामदेवाचेतर्फें महाप्रधान कृष्ण कावळे भारद्वाज गोत्री यजुर्वेदी ब्राह्मण हा कारभार चालवीत होता, त्याच्यापासून भीमदेवानें राजसत्ता इ. स. १२९४ सालीं आपल्या ताब्यांत घेतली. बिंबाख्यान व कौस्तुभचिंतामणि ह्या ग्रंथांवरून असें समजतें कीं, भीमदेव हा अनहिलवाड्यावरून जलमार्गानें शक १२१६ ह्या वर्षीं कोंकणांत आला; व त्यानें माहीम (महिकावती) आपल्या राज्याची राजधानी केली. त्यानें उत्तर कोंकणाचे पंधरा विभाग केले; ह्या विभागांत १६२४ खेड्यांचा समावेश होत असे. भीमदेवामागून त्याचा मुलगा प्रतापबिंब (प्रतापदेव) सिंहासनारूढ झाला व प्रतापदेवानंतर नागरदेव हा कोंकणचा कार-

भार पाहूं लागला. परंतु हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, कोंकण प्रांत हें स्वतंत्र राज्य नसून तें देवगिरीच्या यादवांच्या आधिपत्याखालीं होतें. आतां आपण देवगिरीकडे वळूं.

इ. स. १३०९ सालीं रामदेव निवर्तले व त्यांचा मुलगा शंकरदेव हा देवगिरीचा सम्राट् झाला. परंतु शंकरदेव दिल्लीच्या बादशहास वेळच्यावेळीं खंडणी देईना; असें झाल्यामुळें दिल्लीच्या बादशहानें आपला सेनापति मलिक काफर ह्यास देवगिरीवर पाठविलें. तेथें जी लढाई झाली तींत शंकरदेवाचा पराभव होऊन तो मारला गेला; आणि देवगिरीचें राज्य मोंगलांच्या सत्तेखाली आलें. ही शोचनीय गोष्ट इ. स. १३१२ ह्यावर्षीं घडून आली. ह्यानंतर अल्लाउद्दीन मरण पावला ही संधि पाहून रामदेवाचा जांवई हरपालदेव ह्यानें सैन्य जमवून मुसलमानांचा पराभव केला व देवगिरी आपल्या स्वाधीन करून घेतली; परंतु इ. स. १३१८ मध्यें अल्लाउद्दीनाचा तिसरा मुलगा मुबारीक ह्यानें देवगिरीवर स्वारी करून हरपाळदेवाचा पराभव केला व त्याचे निर्दयपणें हाल करून त्यास ठार मारिलें व देवगिरीच्या साम्राज्याचा विध्वंस केला.

ह्याप्रमाणें देवगिरीच्या साम्राज्याची जरी धुळधाण झाली तरी कोंकणप्रांत पूर्णपणें अविंधांच्या सत्तेखालीं आला नव्हता. मागें सांगितलेंच आहे कीं, नागरदेव हा कोंकणाचा कारभार पाहात होता; तो राज्य करीत असतांना इ. स. १३४७ मध्यें गुजरा-

थच्या राजाचा सेनापति नाईक मलिक ह्यानें कोंकण प्रांतावर स्वारी केली व त्यांत नागरदेवाच्या सैन्याचा पराभव होऊन नागरदेव व त्याची राणी हीं मारलीं गेलीं, व उत्तर कोंकण प्रांत बहामनी वंशांतील मुसलमान राजांच्या स्वाधीन झाला.

प्रकरण दुसरें.

मुसलमानी अंमल.

ह्याप्रमाणें इ. स. १३४७–१४०० पर्यंत जरी कोंकण प्रांत अविंधांच्या सत्तेखालीं होता, तरी चौदाव्या शतकाच्या समाप्ती-पर्यंत कोंकण प्रांतांत हिंदूंची कित्येक मांडलीक राज्यें होतीं; व ह्यांपैकीं कांहीं विजयानगरच्या सम्राटाचें स्वामित्व कबूल करीत, व कांहीं गोंवळकोंड्याच्या मुसलमान राजांस करभार देत. ह्या संस्था-नांपैकीं जव्हार हें एक जुनें संस्थान असून बहामनी सत्ता कोंक-णांत रूढ झाल्यावर, गुजराथच्या बहामनी राजानें इ. स. १३४७ सालीं जव्हारच्या संस्थानिकास **राजा** असा किताब दिला. इति-हासकार अर्सकिन ह्मणतो कीं, अहंमदशहानें पंधराव्या शतकांत सर्व कोंकण प्रांत आपल्या सत्तेखालीं आणला होता, आणि "मिराति अहमदी" ह्या ऐतिहासिक ग्रंथावरून असें कळून येतें कीं, गुज-राथच्या राजाच्या सत्तेखालीं असलेल्या कोंकण प्रांतांत पुढील मुलखाचा समावेश होत असे. वसई, मुंबई, दमण, दांडाराजापूर हे प्रांत कोंकण प्रांतांत मोडत असून, त्यांतील शहरांत वसई, दाभोळ, चौल, दांडा, पनवेल, कल्याण, भिवंडी, गोवें व दांडा-राजापूर, हीं शहरें प्रमुख म्हणून गणलीं जात होतीं.

ह्यावेळीं घडून आलेली एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट येथें नमूद करणें इष्ट दिसतें. गोवें येथील गव्हर्नराचा मुलगा बहादुरखान गेलानी ह्यानें माहीम, साष्टी, दाभोळ, वसई इत्यादि बराच मोठा कोंकणांतील प्रांत इ. स. १४९० च्या सुमारास काबीज केला होता, व सुमारें एक वर्षपर्यंत तो त्या प्रांतावर अंमल चालवीत होता. हा बहादुरखान गेलानी त्यावेळीं एवढा बलाढ्य मानला गेला होता कीं, ह्याला इतिहासकारांनीं Invincible किंवा अजिंक्य म्हटलें आहे. त्यावेळीं ह्यानें साष्टी प्रांतांतील जमीनदारांस त्यांच्या सनदा बहाल करून दिल्या होत्या. त्यांपैकीं कांहीं कागदपत्र हलीं उपलब्ध असून भीमदेवाचे राजगुरु पुरुषोत्तमपंत कावळे ह्यांच्या वंशजांस दिलेल्या सनदा अद्यापि आमच्या संग्रहीं आहेत. वरील बहादुरखानाचें वर्चस्व गुजराथचा राजा महंमद बेगडा ह्यास सहन न होऊन त्यानें बहामनी राजांच्या सेनापतींच्या मदतीनें दाभोळवर स्वारी केली, व कोल्हापूर येथें लढाई होऊन तींत बहादुरखान गेलानी मारला गेला. ह्यानंतर इ. स. १५७२ पर्यंत उत्तर कोंकण प्रांत अविंधांच्या सत्तेखालीं होता.

प्रकरण तिसरें.

पोर्तुगीज राजसत्ता.

इ. स. १५०७ मध्यें पोर्तुगीजांचा गोवें येथील गव्हर्नर डॉन् डी आल्मिडा ह्याचा मुलगा लॉरेन्झो आल्मिडा ह्यानें चौल बंदरावर स्वारी करून मुसलमान अधिकाऱ्यांच्या सात गलबतांचा नाश केला व तेथून तो दाभोळ बंदरावर गेला. ह्या कालापासून कोंकणांत पोर्तुगीजांचा प्रवेश होऊं लागला. पुढील वर्षी म्हणजे इ. स. १५०८ सालीं गव्हर्नर डॉन् डी आल्मिडा ह्याच्या आरमारानें दींव येथें गुर्जरनृपतीच्या सत्तेचा नाश केला व ह्या वेळेपासून पोर्तुगीजांची सत्ता उत्तर कोंकणावर सुरू झाली, कारण कोंकण प्रांताची उत्तर सरहद्द दींव व दमणपर्यंत होती. पुढें इ. स. १५२७ मध्यें पोर्तुगीजांनीं जलमार्गानें मुंबईजवळील वांद्रें गांवावर हल्ला करून तेथील किल्ल्यावरील मुसलमान अधिकाऱ्याचा पराभव केला. विजापूर व अहमदनगर येथील राजांमध्यें परस्पर वैमनस्य असल्यामुळें, विजापूरच्या राजाशीं लढण्याचे कामांत आपणास पोर्तुगीजांपासून मदत होईल ह्या उद्देशानें अहमदगनरच्या राजानें त्यांस चौल येथें वखार घालण्याची व किल्ला बांधण्याची परवानगी दिली. इ. स. १५२९ मध्यें उत्तर कोंकणांतील प्रसिद्ध ठिकाणें म्हणजे ठाणें, वांद्रें, करंजा व साष्टी हीं

पोर्तुगीजांच्या सत्तेखालीं आली. इ. स. १५३३ ह्या वर्षी १८०० पोर्तुगीज शिपाई व २००० कानडी शिपाई ह्यांनीं भरलेल्या पोर्तुगीजांच्या ऐंशीं गलबतांच्या आरमारानें वसईवर स्वारी करून तेथील किल्ल्याचा विध्वंस केला, व पुढें मुसलमानांच्या ताब्यांत असलेलीं तारापूरपर्यंतचीं सर्व ठाणीं जाळून टाकलीं. ह्या सर्व कृत्यामुळें गुजराथचा मुसलमान राजा भयभीत होऊन, अहमद-नगरच्या राजास पोर्तुगीजांनीं ज्याप्रमाणें सहाय्य केलें, त्याप्रमाणें आपणासही करावें ह्या हेतूनें त्यांस वसई बंदर देऊन त्यानें आपलें सर्व आरमार त्यांच्या संरक्षणाखालीं ठेविलें. इ. स. १५५६ त असेरी व मनोर येथील किल्ले पोर्तुगीजांच्या स्वाधीन झाले, व पुढें लवकरच दमण व तारापूर यांमधील सुपीक प्रांत मुसल्मान राजां-पासून त्यांच्या सत्तेखालीं आला. ह्याप्रमाणें सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कोंकणाचा बहुतेक सर्व प्रदेश पोर्तुगीजांच्या अंमलाखालीं आला होता.

हा काळपर्यंत पोर्तुगीजांचा उत्कर्ष होत गेला, परंतु ह्यापुढें त्याला ओहोटी लागली व ह्याचें कारण त्यांनीं केलेला धर्मच्छल होय. इ. स. १५४८ सालीं सेंट फ्रॅन्सिस् झेवियर यानें वसई येथें धर्मशिक्षणाची पाठशाळा काढली व इ. स. १५५२ सालीं त्यानें आपले धर्मोपदेशक वसई, ठाणें, व चौल येथें पाठविले.

इ. स. १५६० ह्या वर्षीं फ्रॅन्सिस्कन धर्मोपदेशकांनीं कान्हेरी व मंडपेश्वर येथें रहाणाऱ्या हिंदू साधू व योगी लोकांस घालवून देऊन तीं ठिकाणें आपल्या ताब्यांत घेतली. घारापुरी, कान्हेरी, व मंडपेश्वर हीं स्थानें एतद्देशीय लोक पवित्र मानीत असल्यामुळें तेथील खोदकामाचा नाश करण्याचा प्रयत्न त्या धर्मोपदेशकांनीं केला. मंडपेश्वर येथील गुहेच्या जागीं त्यांनीं ख्रिस्ती देऊळ बांधलें व साष्टी येथें, जुलमानें ख्रिस्ती केलेल्या लोकांच्या मुलांना धर्मशिक्षण देण्याकरितां कॉलेज स्थापिलें, व तेथील हिंदू धर्मसंस्थांकडे पूर्वापार चालत असलेल्या वतनांचें उत्पन्न त्यांनीं ह्या ख्रिस्ती संस्थांच्या खर्चाकडे लाविलें.

यापुढें क्रमाक्रमानें बहुतेक सर्व सत्ता ह्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या हातांत आली, व ख्रिस्ती धर्मसंस्थांचें उत्पन्न पोर्तुगाल देशच्या राजाच्या हिंदुस्थानांतील उत्पन्नापेक्षांही जास्त झालें. गोवें येथें स्थापन केलेल्या Court of Inquisition (कोर्ट ऑफ् इन्क्विझिशन) ची सत्ता उत्तर कोंकणांतील सर्व पोर्तुगीज प्रांतांवर चालत असून कोणत्याही मनुष्याला पकडण्याचा अधिकार त्या कोर्टाला होता. ह्या कोर्टाचा अधिकार इतका अमर्यादित होता कीं, प्रसंगवशात् त्याला, लिस्बन येथील दरबारची व तेथील कोर्ट ऑफ् इन्क्विझिशन्ची मंजुरी मिळाल्यास, गोवें येथील गव्हर्नर व

आर्चबिशप ह्यांनाही पकडतां येत असे. अशी अमर्याद सत्ता हातीं असल्यामुळें पोर्तुगीज लोकांनीं पुष्कळ लोकांस जुलमानें ख्रिस्ती करण्यासाठीं त्यांची अनेक प्रकारें विटंबना करून त्यांस ख्रिस्ती केलें. अशा लोकांची संख्या साठ हजारांपेक्षां जास्त होती असें इतिहासकारांचें म्हणणें आहे.

इ. स. १५५५ सालीं पोर्तुगीज गव्हर्नराच्या हुकमानें वसई प्रांतांतील सार्वजनिक किंवा खासगी देवळांत हिंदूंस पूजा करण्याची मनाई करण्यांत आली, व त्याप्रमाणेंच ब्राह्मणांकडून होणारे स्नानविधि, वेदपठन, होम व देवदेवतांचे सार्वजनिक उत्सव बंद करण्यांत आले. हिंदूंच्या घरांत मूर्ति आहेत कीं काय, आणि हिंदू लोक मनाई केलेले धार्मिकविधि करतात कीं काय, हें पहाण्याकरतां त्यांच्या घरांची झडती घेत, व त्या झडतींत जर घरांत एखादी मूर्ति सांपडली व मनाई केलेले धर्मसंस्कार करतांना कोणी मनुष्य आढळून आला, तर त्याला देहांत शिक्षा देत व त्याची सर्व मालमत्ता जप्त करून त्यांतील अर्धाभाग जेसुइट पाद्र्यांस देत व अर्धा हिस्सा अशी बातमी देणारांस देत असत.

इ. स. १५९४ मध्यें रोमचा पोप व पोर्तुगालचा राजा ह्यांजकडून एतद्देशीय लोकांस जुलमानें ख्रिस्ती करण्याबद्दल हुकूम आला, व ह्या हुकमान्वयें अनेक देवळांचा नाश करण्याचा, व

वसंई प्रांतांतील लोकांस लुटण्याचा, पोर्तुगीज धर्मोपदेशकांनीं प्रारंभ केला.

अशाप्रकारें धर्मच्छलाचा अतिरेक झाल्यामुळें सर्वत्र असंतुष्टता उत्पन्न झाली, व हा धर्मच्छल पोर्तुगीजांच्या कोंकणांतून झालेल्या उच्चाटनाचें प्रधान कारण होय, असें अनेक विद्वान् इतिहासकारांचें म्हणणें आहे.

प्रकरण चवथें.

मराठी राजसत्ता.

मराठी राज्याचे संस्थापक छत्रपति शिवाजी महाराज ह्यांची राजधानी दक्षिण कोंकणांतील रायगड किल्ला असल्यामुळें, जंजिऱ्याचा प्रांत खेरीजकरून सर्वत्र दक्षिण कोंकणांत मराठ्यांची सत्ता चालत होती. उत्तर कोंकणांतील कल्याण बंदर शिवाजी महाराजांनीं काबीज केलें होतें, परंतु तेथील इतर सर्व प्रदेशांवर इ. स. १७३९ पर्यंत पोर्तुगीजांची सत्ता अव्याहत चालू होती. वर दर्शविलेंच आहे कीं, पोर्तुगीजांनीं धार्मिक बाबतींत लोकांवर अमानुष जुलूम केल्यामुळें इ. स. १७३९ सालीं त्यांची सत्ता लयास गेली, व राज्यशकट मराठ्यांच्या हातीं आला. ह्या गोष्टीच्या प्रमुख कारणाचा आपण संक्षेपतः विचार करूं.

आतां नवीन उपलब्ध झालेल्या त्या वेळच्या बाजीराव बल्लाळ व चिमणाजी आप्पा ह्यांच्या आमच्या संग्रहीं असलेल्या अस्सल लेखांवरून असें आढळून येतें कीं, इ. स. १७३९ च्या पूर्वीं आठ दहा वर्षें मराठे सरदारांमध्यें पोर्तुगीजांपासून वसई व साष्टी प्रांत काबीज करण्याचें खलबत चालू होतें. मालाड परगण्याचे जुने सरदेसाई व धर्माधिकारी अंताजी रघुनाथ कावळे व त्यांचे बंधु

ह्यांनीं, हिंदु लोकांवर पोर्तुगीज लोकांनीं केलेल्या धर्मच्छलाचें गाऱ्हाणें शाहूमहाराज व त्यांचे शूर प्रधान बाजीराव बल्लाळ ह्यांच्या-पाशीं नेलें होतें, व वसई प्रांत कोणत्या रीतीनें काबीज करावा ह्या संबंधानें अंताजी रघुनाथ आणि बाजीराव बल्लाळ व त्यांचे बंधु चिमणाजी आप्पा ह्यांमध्यें परस्पर पत्रव्यवहार व गुप्त खलबत चालू होतें असें ह्या उपलब्ध झालेल्या अस्सल लेखांवरून व्यक्त होतें.

शके १६५१ (इ. स. १७२९) ह्या वर्षीं पंतप्रधान बाजीराव बल्लाळ ह्यांनीं अंताजींचे बंधु रामचंद्रपंत ह्यांस लिहिलेल्या * पत्रांत पंतप्रधान म्हणतातः—" तुम्हीं जिवाजी गोविंद या समागमें पत्र पाठवलें तें पावलें. सविस्तर वर्तमान कळलें. त्यास आमचेही चित्तीं हाच हेत आहे कीं, कार्य करावें. अशा निमित्त अंताजीपंतांस जें सांगणें तें सांगितलें आहे. तुम्हीं आपली खातरनिशा चित्तांत धरून कार्य साधणें. तुमचे मनोदयानुरूप ऊर्जित करूं. येथून राजश्री बापूजी मेघःशाम व दत्ताजी तुर्क पाठवले आहेत. त्यांची निशा सर्व गोष्टींची करणें."

चंद्र २२ साबान शके १६५१ रोजीं चिमणाजी आप्पांनीं अंताजीपंतांस लिहिलेल्या पत्रांतील आशय पुढें दर्शविल्याप्रमाणें आहेः—" तुम्ही पत्र पाठवलें तें प्रविष्ट जाहालें. लेखनार्थ विस्तारें

---

* हें पत्र सुरसन सलासिन मया व अलफ, रा। छ १९ रज्जब रोजीं लिहिलें आहे.

कळला. ऐशियास मुख्य भावार्थ कीं, अवघा प्रसंग सत्य भासून कर्तव्य असेल तें तैशीस आज्ञा करावी. नाहींतर दुराशेंत गुंतावें सारिखें नाहीं, म्हणून लिहिलें; ऐशियास अवघा प्रसंग तुम्ही आणून दिला आहे त्यास अनृत काय निमित्त भासेल? अवघा प्रसंग सत्यच आहे व कार्यही कर्तव्य आहेच आहे. तुम्ही चित्तांत संशय आणावा असा अर्थ नाहीं. कर्णाजी शिंदे यांजकडून मनुष्य देवविले ते आले नाहीं म्हणून लिहिलें; त्यास पहिलें लिहिलें होतें, हल्लींही लिहिलेलें आहे. ते मनुष्य देतील."*

वरील लेखांवरून असें सिद्ध होतें कीं, कोंकणांतून पोर्तुगीजांना घालवून देण्याची मसलत इ. स. १७२९ पासून चालू होती; परंतु नरवीर बाजीराव अन्यत्र महत्त्वाच्या राजकारणांत व युद्ध-प्रसंगांत गुंतल्यामुळें त्यांस हें काम हातीं घेण्यास अवकाश मिळाला नाहीं; आणि म्हणून त्यांनीं वसई प्रांत जिंकण्याचें कार्य आपले बंधु चिमणाजी आप्पा ह्यांजकडे सोंपविलें.

ह्याप्रमाणें इ. स. १७३७ मध्यें मराठ्यांनीं साष्टीवर स्वारी करून घोडबंदर व वसईची खाडी हीं आपल्या ताब्यांत घेतलीं. ह्यानंतर त्यांनीं ठाण्यावर हल्ला करून तें शहरही काबीज केलें. पुढें मराठे मुंबई शहरावर स्वारी करतील अशी भीति वाटून इंग्रजांनीं पोर्तुगीजांच्या अनुमतीनें वांद्याचा किल्ला जमीनदोस्त केला.

---

* उपोद्घातांत ह्या विषयाचें विवेचन अधिक विस्तारानें केलें आहे तें पहावें.

इ. स. च्या १७३९ च्या जानेवारी महिन्यांत चिमणाजी आप्पानें मराठ्यांच्या सैन्याचें आधिपत्य स्वतः स्वीकारून, डहाणू, केळवें, शिरगांव व तारापूर येथील किल्ले काबीज केले; आणि ह्यानंतर थोड्याच अवधींत साष्टी प्रांतांतील वेसावा व धारावी येथील किल्लेदार चिमणाजी आप्पांस शरण येऊन त्यांनीं तीं ठिकाणें मराठ्यांच्या स्वाधीन केलीं. ह्यावेळीं पंतप्रधान बाजीरावसाहेब विजयश्रीसंपादनासाठीं उत्तर हिंदुस्थानांत गेले होते, त्यांस नादिरशहा दिल्लीवर चाल करून येत आहे ही बातमी मिळाल्यामुळें, त्यांनीं चिमणाजी आप्पांस सैन्यासह उत्तर हिंदुस्थानांत येण्याची आज्ञा केली. परंतु पोर्तुगीजांकडून वसईप्रांत काबीज केल्याशिवाय इतर दुसरें कार्य हातीं घ्यावयाचें नाहीं, असा चिमणाजी आप्पांचा दृढनिश्चय असल्यामुळें व तशा अर्थाचें आपले मित्र मालाडचे सरदेसाई, अंताजी रघुनाथ ह्यांस त्यांनीं अभिवचन दिल्यामुळें,बाजीरावांचा आदेश कांहीं वेळ बाजूस ठेऊन १७ फेब्रुवारी १७३९ रोजीं, त्यांनीं मराठ्यांचें सैन्य वसईच्या किल्ल्यासमोर नेलें व किल्ल्यास वेढा दिला; आणि तीन महिनेपर्यंत पोर्तुगीजांच्या हल्ल्यांचा शौर्यानें प्रतिकार करून १६ मे रोजीं तो किल्ला सर केला. ह्याप्रमाणें वसई मुक्कामीं मराठ्यांस जय मिळून वसईचा मजबूत किल्ला त्यांच्या हस्तगत झाल्यामुळें मुंबई येथील इंग्रज अधिकाऱ्यांच्या पोटांत भीति उत्पन्न झाली, आणि मुंबईचे गव्हर्नर स्टीफन लॉ ह्यांनीं आपलें कौन्सिल बोलावून शाहूमहाराज व चिमणाजी आप्पा

ह्यांचा स्नेह संपादन करण्यासाठीं त्यांच्याकडे वकील पाठविण्याचें ठरविलें. ह्या ठरावान्वयें कॅपटन गॉर्डन ह्यांना सातार्‍यास शाहू महाराजांकडे जाण्याकरितां नेमिलें, व त्याचवेळीं कॅपटन इंचबर्ड ह्यांची योजना वसई प्रांतीं चिमणाजी आप्पा ह्यांचा स्नेह संपादण्यासाठीं झाली.

कॅपटन गॉर्डन १७३९ च्या मे महिन्याच्या २३ व्या तारखेस सातार्‍यास पोंचला. परंतु तेथें गेल्यावर त्यास असें समजलें कीं, शाहूमहाराज सातार्‍यापासून पांच दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर असलेल्या मिरा नांवाच्या मोंगलांच्या ठिकाणास वेढा देण्याकरितां गेले आहेत. जूनच्या ७ व्या तारखेस शाहूमहाराज सातार्‍यास परत आल्यावर त्यांच्याशीं बाजीरावांचे कारभारी महादाजीपंत ह्यांचे मार्फत गॉर्डनची मुलाखत झाली. महादाजीपंतांनीं महाराजांस बाजीरावांकडून आलेले कागदपत्र सादर केले व त्याचवेळीं महाराजांचा स्नेह संपादन करण्यासाठीं इंग्रजांकडून वकील आला आहे असेंही सांगितलें. ह्यावर शाहूमहाराज म्हणाले, "आतां बाजीराव व चिमणाजी ह्यांस वसई हस्तगत झाल्यामुळें एक सुरक्षित स्थान मिळालें आहे" व इंग्रजांसंबंधानें महाराज म्हणाले, "इंग्रजांचा वकील आला आहे, ठीक, इंग्रज हे चांगले लोक आहेत; आणि जर मी त्यांना आश्रय दिला तर बाजीराव त्यांना त्रास देईल काय?" ह्यावर महादाजीपंत म्हणाले, "असला विचार पंतप्रधान साहेबांच्या स्वप्नींही येणार नाहीं." दुसर्‍या दिवशीं म्हणजे ८ जून रोजीं

कॅप्टन गॉर्डन हे पुन्हा शाहूमहाराजांच्या भेटीस गेले त्यावेळीं त्यांनीं आपल्या बरोबर आणलेल्या देणग्या महाराजांस सादर केल्या; तसेंच इंग्रज सरकाराकडून पंतप्रधानांचे चिरंजीव बाळाजीपंत, पंतप्रतिनिधि श्रीपतराव वगैरेंस देण्यासाठीं नेलेल्या देणग्या त्यांस अर्पण केल्या व त्यांनीं इंग्रजांविषयीं सहानुभूति ठेवावी म्हणून विनंति केली.

चिमणाजी आप्पांचा स्नेह संपादण्यासाठीं कॅप्टन इंचबर्डची योजना झाली खरी, परंतु तो तिकडे जाण्यापूर्वी मुंबईच्या गव्हर्नरानें आपल्या जासुदाबरोबर एक पत्र, व भेटीदाखल सहा वार लाल मखमल, सहावार हिरवी मखमल व सहावार इतर मूल्यवान् कापड पाठविलें होतें. ह्यावर चिमणाजी आप्पांनीं उलट पत्रीं कळविलें कीं, " आमच्या स्नेहाची आपणांस अपेक्षा आहे हें ऐकून आम्हांस आनंद झाला व ह्याचा विशेष विचार करण्याकरितां आपण कॅपटन इंचबर्ड ह्यांची ताबडतोब रवानगी करावी." त्याप्रमाणें जूनच्या ८ व्या तारखेस इंचबर्ड वसईस जाऊन पोंचला. तेथें गेल्यावर त्यास असें आढळून आलें कीं, मराठ्यांनीं मुंबईवर हल्ला करूं नये म्हणून त्यांस इंग्रजांनीं देणगीदाखल पैशाची मोठी रक्कम द्यावी असें मराठ्यांच्या मनांत आहे, परंतु तसें करतां येणार नाहीं असें इंचबर्डनें चिमणाजी आप्पांस सांगितलें. ह्यावर आप्पासाहेब म्हणाले, " ठीक आहे; परंतु इंग्रजांनीं आमच्या शत्रूंस वेळोवेळीं दारुगोळा व इतर लढाईच्या साधनांची मदत केली हें ठीक झालें नाहीं."

ह्यावर इंचबर्डनें उत्तर दिलें कीं, "पोर्तुगीज आमचे शेजारी असल्यामुळें तसें करणें भाग पडलें; परंतु आतां आपण आमचे स्नेही व शेजारी झाल्यामुळें आपणांसही तशीच मदत करूं." ह्याच वर्षीं इंग्रजांचा मराठ्यांबरोबर तह होऊन त्यांत असें ठरलें कीं, मराठ्यांच्या गलबतांस माहीम व वांद्रें येथील दर्यांत येण्यास इंग्रजांनीं कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करूं नये व दोन्ही सरकारांनीं व्यापारी गलबतांस परस्परांचे परवाने द्यावे."

वसई घेतल्यानंतर एक वर्षाच्या आंतच म्हणजे इ. स. १७४० च्या एप्रिल महिन्यांत बाजीराव पेशवे मरण पावले व त्यांच्यामागून लवकरच त्याच वर्षीं चिमणाजी आप्पाही निवर्तले. ह्या दोन भारतवीररत्नांच्या अकालिक मृत्युमुळें महाराष्ट्राचीच नव्हे तर सर्व भरतभूमीची हानि झाली. बाजीरावाच्या मागून त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव पेशवा झाला. परंतु त्याच्या आंगीं बाजीरावां-सारखें शौर्य, न्यायबुद्धि व सर्वांशीं मिळूनमिसळून वागण्याचें चातुर्य नसल्यामुळें महाराष्ट्रांत अनेक जातीजातींत तंटे उप-स्थित झाले.

वसई व साष्टी घेतल्यावर चांच्यांपासून रहिवाशांचें संरक्षण व्हावें म्हणून डहाणू, तारापूर व वसई येथील किल्ल्यांची डागडुजी करण्यांत आली व ह्याच कारणाकरितां केळवें येथें नवीन किल्ला बांधला गेला. इ. स. १७६६ मध्यें थोरले माधवराव पेशवे अस-तांना इंग्रजांनीं साष्टी व मुंबईच्या आसपास असलेलीं बेटें घेण्याचा

प्रयत्न चालू केला होता, परंतु माधवरावानें आमरण म्हणजे इ. स. १७७१ पर्यंत ह्या कामीं इंग्रजांना दाद दिली नाहीं. तथापि माधवरावाच्या मरणानंतर पुढें इंग्रजांस आपला हेतु साधण्याकरितां आयतीच संधि मिळाली; ती अशीः--इ. स. १७७४ सालीं मराठ्यांनीं पोर्तुगीजांचें एक लढाऊ गलबत पकडल्यामुळें मराठ्यांच्या उत्तर कोंकणांतील बंदरावर स्वारी करण्याकरितां पोर्तुगाल देशाहून मदतीसाठीं मोठें सैन्य पाठविण्यांत आलें. हें सैन्य इकडे येण्याच्या पूर्वींच ठाणें शहर आपण हस्तगत करावें असें इंग्रजांस वाटून त्यांनीं ६०० इंग्रज व १२०० एतद्देशीय शिपाई ठाणें शहरावर पाठविले. त्यावेळीं किल्ल्यांत मराठ्यांचे फक्त ५०० शिपाई होते, परंतु त्यांनीं इंग्रजांच्या सैन्यास जर्जर करून पहिल्या दिवशींच त्यांचे १०० गोरे शिपाई ठार केले. परंतु दुसरे दिवशीं इंग्रजांनीं दुसरा हल्ला केला, त्यांत मराठ्यांचा पराभव होऊन किल्ला इंग्रजांच्या हातीं आला. ह्यानंतर थोड्याच दिवसांत वेसाव्याचा किल्लाही इंग्रजांच्या स्वाधीन झाला. पुढें इ. स. १७७५ च्या मार्च महिन्यांत रायोबादादानें सुरतेच्या तहान्वयें वसई व साष्टी हे प्रांत इंग्रजांच्या स्वाधीन केले, परंतु पुन्हां इ. स. १७८२ च्या सालबाईच्या तहांत ठरल्याप्रमाणें साष्टी, घारापुरी व करंजा हीं खेरीज करून इंग्रजांनीं वसई आदिकरून जिंकलेलीं ठाणीं मराठ्यांस परत दिलीं.

प्रकरण पांचवें.

इंग्रजी राजसत्तेचा प्रारंभ.

इ. स. १८०२ सालीं होळकरानें पुण्यावर स्वारी केल्यामुळें दुसरा बाजीराव महाड गांवीं पळून गेला. पण तेथेंही सुरक्षितपणा न वाटल्यामुळें तो चौलास आला व तेथून पुढें इंग्रजांच्या साह्यानें वसईस येऊन पोंचला. बाजीराव वसईस येऊन पोंचला ही बातमी मुंबईच्या गव्हर्नरास समजतांच त्यानें कर्नल क्लोज व माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्यांस वसईस पाठविलें; व त्यांचें बाजीरावाबरोबर बोलणें होऊन ता. ३१ डिसेंबर १८०२ रोजीं इंग्रज व पेशवे ह्यांमध्यें तह ठरला. ह्या तहास वसईचा तह असें म्हणतात. त्या तहांत ठरल्याप्रमाणें इंग्रजांनीं संरक्षणासाठीं बाजीरावाबरोबर २२०० इंग्रज शिपाई व तोफखाना देऊन त्यास पुण्यास रवाना केलें. ह्यावेळेपासून बाजीराव इंग्रजांचा अंकित झाला.

यापुढें उत्तरोत्तर, मराठ्यांच्या सत्तेचा ऱ्हास होत जाऊन, प्रतापशाली शिवनृपतीनें कष्ट सोसून संपादिलेलें, आणि शौर्यशाली बाजीरावानें वृद्धिंगत केलेलें मराठ्यांचें स्वराज्य नामर्द व पलायन-पटु रावबाजीनें आठ लक्ष रुपयांच्या वार्षिक वेतनासाठीं सन १८१८ सालीं परद्वीपस्थाच्या हवालीं केलें; आणि तेणेंकरून महाराष्ट्राचेंच नव्हे तर अखिल भरतखंडाचें स्वातंत्र्य व स्वराज्य हीं विलयास गेलीं.

प्रकरण सहावें.

उत्तर कोंकणांतील लोकवसति.

उत्तर कोंकणांतील मूळच्या रहिवाशांमध्यें प्रामुख्यानें आगरी, कोळी (डोंगरी व दर्यावर्दी), वार्ली, कातकरी व ठाकूर ह्यांची गणना करतां येईल. कुणब्यांपैकीं वैती, कोंकणी मराठे व चौकळशी हे उत्तर कोंकणांतील जुने रहिवासी असावे असें दिसतें. ह्यानंतरचे रहिवासी म्हणजे हिंदू अमदानींत ख्रिस्ती शकापूर्वी दोनशें वर्षांपासून इ. स. १३४७ पर्यंत आलेले लोक होत. तिसरी लोकवस्ती मुसलमान व पोर्तुगीज अमदानींतील असून त्या लोकांच्या आगमनाचा काल इ. स. १३४७ पासून १७४० पर्यंतचा होय आणि चवथी वसाहत मराठेशाहींतील इ. स. १७४० ते १८०० पर्यंतची होय.

ऐतिहासिक कालांतील हिंदू राजांच्या सत्तेचा आरंभ मौर्य घराण्यापासून होतो. त्यानंतर क्षत्रप, आंध्रभृत्य, पूर्वचालुक्य, राष्ट्रकूट, उत्तरचालुक्य, शिलाहार व यादव ह्या घराण्यांची सत्ता अनुक्रमें उत्तर कोंकणावर होती असें पूर्वी दर्शविलें आहे. ह्या प्रत्येक घराण्याच्या राजांबरोबर कांहीं लोक महाराष्ट्रांतून, कांहीं गुजराथेंतून व कांहीं लोक हलींच्या मद्रास इलाख्यांतून आलेले दिसतात. हे सर्व लोक हिंदू होत. उत्तर कोंकणांतील ठाणें,

सोपारें, कल्याण इत्यादि शहरें समुद्रास लागून असल्यामुळें अरब लोकांचेंही दळणवळण पूर्वीपासूनच सुरू होतें व उत्तर कोंकणांत त्यांची वसतीही थोडीबहुत होती; व इ. स. १३४७ नंतर मुसलमानी सत्ता कोंकणांत रूढ झाल्यावर, गुजराथ आदिकरून इतर प्रांतांतून बरेच मुसलमान लोक येथें येऊन राहिले. कोंकणांतील प्राचीन मुसलमान लोकांस कोंकणी मुसलमान असें म्हणतात व ते मराठी भाषा बोलतात. सातव्या शतकांत इराणच्या यज्दगर्द राजाचा पराभव अरबांनीं केल्यानंतर पारशी लोक संजाण, तारापूर, ठाणें इत्यादि प्रदेशांत येऊन राहिले. मुंबई बेट कंपनीच्या स्वाधीन झाल्यावर सुरत, नवसारी, इत्यादि प्रांतांतून पारशांचीं पुष्कळ कुटुंबें या प्रांतांत येऊन तेथें त्यांनीं कायमची वसति केली. पोर्तुगीज लोकांच्या अमदानींत त्यांच्या धर्मोपदेशकांनीं व अधिकाऱ्यांनीं जुलमानें लोकांस बाटविलें व अशा ख्रिस्ती केलेल्या लोकांची संख्या अठराव्या शतकांत ६०००० पेक्षां जास्त होती असा लेख आढळतो.

कोंकणांतील मराठे व कुणबी लोकांमध्यें आढळून येणारीं मोरे, चाळके, चव्हाण, शेलार व जाधव हीं आडनांवें अनुक्रमें मौर्य, चालुक्य, चौहाण, शिलाहार व यादव ह्या शब्दांचीं ग्राम्य रूपें किंवा अपभ्रंश होत. शिलाहार हे मूळचे द्रविड किंवा कन्नड देशांतील असल्यामुळें त्यांच्या अमदानींत उत्तर कोंकणांत कानडी भाषा बोलणाऱ्या लोकांची वसति थोडीबहुत झाली होती. शिला-

द्वारांच्या वेळेस कांहीं कायस्थ प्रभूंचीही वसति उत्तर कोंकणांत होती असें कांहीं प्राचीन लेखांवरून आढळतें.

ब्राह्मणांमध्यें सामवेदी आणि गोवर्धन हे प्राचीन रहिवासी दिसतात. शातवाहन नृपतींच्या कांहीं शिलालेखांत चिंचणी, शूर्पारक वगैरे प्रांतांतील जमिनी ब्राह्मणांस दान दिल्याचा उल्लेख आढळतो. शातवाहनांचे पुरोहित कात्यायन सूत्रानुवर्ती शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण असल्यामुळें शातवाहनांच्या शिलालेखांत दर्शविलेले ब्राह्मण हे शुक्ल यजुर्वेदीयांपैकींच असावेत असें वाटतें. इ. स. १२६० मध्यें उत्तर कोंकण प्रांत यादवांच्या सत्तेखालीं आल्यानंतर त्यांच्या अनुयायांपैकीं पुष्कळ लोक राज्यकारभाराच्या व अन्य कारणांसाठीं उत्तर कोंकणांत येऊन राहिले. ह्यावेळीं ज्या नवीन जाती उत्तर कोंकणांत आल्या, त्यांत प्रामुख्यानें माध्यंदिन शाखेचे यजुर्वेदी ब्राह्मण, सोमवंशी क्षत्रिय, व पाठारे प्रभु ह्यांचा समावेश होतो. ह्या तीन जाती प्राचीन व महत्त्वाच्या असल्यामुळें व त्याप्रमाणेंच गोवर्धन ब्राह्मणांची वसतीही प्राचीन असल्यामुळें त्यांच्यासंबंधानेंही यथार्थ व सविस्तर माहिती नमूद करणें इष्ट दिसतें.

(१) उत्तर कोंकणांतील यजुर्वेदी ब्राह्मण.

देवगिरीच्या यादवांचा व यजुर्वेदीयांचा पूर्वपरंपरागत संबंध असल्यामुळें यजुर्वेदीयांची देवगिरीच्या दरबारांत मोठी प्रतिष्ठा

होती. रामदेवाच्यावेळीं म्हणजे इ. स. १२८० च्या सुमारास उत्तर कोंकणाचा महाप्रधान म्हणजे गव्हर्नर भारद्वाज गोत्री कृष्ण नांवाचा यजुर्वेदी ब्राह्मण होता असें पूर्वोक्त ऐतिहासिक वृत्तांतांत दर्शविलें आहे. ह्या रामदेव नृपतीच्या अमदानींत इ. स. १२९४ ह्या वर्षीं एक अत्यंत उद्वेगजनक गोष्ट घडून आली. दिल्लीच्या बादशहाचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी ह्यानें ८००० स्वारांसह गुप्तपणें देवगिरीवर चाल करून शहरास वेढा दिला. हें वर्तमान रामदेवास कळतांच त्यानें तीन चार हजार फौजेनिशीं शत्रूवर हल्ला केला, परंतु टिकाव निघेना म्हणून त्यानें देवगिरीच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. राजाचा वडील मुलगा शंकरदेव हाही देवगिरी-पासून दूर असल्यामुळें रामदेवानें शत्रूबरोबर तहाचें बोलणें लाविलें व मध्यंतरीं सुरक्षितपणासाठीं व वंशरक्षणासाठीं हा संकटसमय पाहून त्यानें आपला दुसरा मुलगा भीमदेव ह्याचेबरोबर राजगुरु पुरुषोत्तमपंत कावळे व इतर उमराव देऊन त्यास उत्तर कोंकणांत पाठविलें. उत्तर कोंकणांत ह्यावेळेस रामदेवाचेतर्फे महाप्रधान कृष्ण भारद्वाज गोत्री शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण कारभार चालवीत होता, त्याच्यापासून भीमदेवानें राजसत्ता आपल्या ताब्यांत घेतली. हल्लींचे मुंबापुरस्थ यजुर्वेदी ब्राह्मण ह्या पुरुषोत्तम राजगुरूंचे व त्यांच्या अनुयायांचे वंशज होत. इ. स. १७३९ च्या सुमारास ह्या पुरुषो-त्तमपंत राजगुरूंच्या घराण्यांत अंताजी रघुनाथ नांवाचा विख्यात

मुत्सद्दी निर्माण झाला व त्यानें पोर्तुगीजांपासून वसई व साष्टी हे प्रांत घेण्याचे कामीं बाजीराव बल्लाळ व चिमणाजी आप्पा ह्यांस अप्रतिम साहाय्य केलें. साष्टी व वसई प्रांत पोर्तुगीजांच्या ताब्यांत आल्यावर त्यांनीं तेथील लोकांस जुलमानें ख्रिस्ती करण्याचा क्रम सुरू केला होता; परंतु अंताजी रघुनाथ हे हिंदुधर्माभिमानी असल्यामुळें त्यांनीं पोर्तुगीजांच्या जुलमी कृत्यांस विरोध केला. ह्यामुळें गोंव्याचें सरकार असंतुष्ट होऊन त्यांनीं अंताजींची मालाड येथील जहागीर जप्त केली व अंताजींस व त्यांच्या बंधूस अटकेंत ठेवण्याचा प्रयत्न केला. ही बातमी अंताजींस समजतांच ते पोर्तुगीजांचा प्रांत सोडून साताऱ्यास शाहूमहाराजांचे भेटीस गेले व त्यांनीं हिंदूंचें व हिंदुधर्माचें रक्षण करावें अशी विनंती केली. तेव्हां शाहूमहाराजांनीं त्यांस बाजीराव पुण्यास होते तेथें पाठविलें. तेव्हांपासून बाजीराव बल्लाळ व चिमणाजी आप्पा आणि अंताजी रघुनाथ ह्यांचा स्नेहसंबंध जोडला गेला हें वर दर्शविलें आहे. वसई व साष्टी हे प्रांत पोर्तुगीजांपासून घेण्याचे कामीं मदत केल्यास, पोर्तुगीजांनीं घेतलेली तुमची जहागीर तुह्मांस परत मिळेल असें बाजीरावानें व चिमणाजीनें त्यांस अभिवचन दिलें होतें; परंतु इ. स. १७४० मध्यें बाजीराव साहेबांच्या मरणानंतर त्यांचे पुत्र बाळाजी ह्यांनीं अंताजींची जहागीर त्यांस परत देण्याचे कामीं पुष्कळ आढेवेढे

घेतले. असा वचनभंग झाल्यामुळें अंताजी व तुकंभट्ट पळशीकर * अग्निहोत्री हे आणि नानासाहेब पेशवे ह्यांच्यामध्यें बेबनाव झाला. ह्यापुढें अंताजी लवकरच निवर्तले; आणि त्यांचे भाचे व वारस तुकंभट्ट पळशीकर व बाळाजींचे वसईचे सुभेदार आणि इतर कोंकणस्थ अनुयायी ह्यांच्यांत चुरस उत्पन्न होऊन तंटा विकोपास

---

* तुकंभट्ट पळशीकरांच्या पूर्वजांचे मूलस्थान कऱ्हाड–विजापूर रस्त्यावरील खानापुरापासून सात मैलांवर असणारा **पळशी** गांव होय. हा गांव पूर्वी चांगला भरभराटीस आलेला असून, तेथें कुलदुर्ग नांवाचा एक विस्तीर्ण किल्ला आहे. तेथील मोडक्या भिंती व तटबंदी हीं त्याच्या प्राचीन वैभवाचीं अवशिष्ट चिन्हें अद्यापि दृग्गोचर आहेत. यावरून असें दिसून येईल कीं, पळशीकर हें नांव वरील गांवावरून पडलें असून त्याचा मगध देशाशीं कांहींही संबंध नाहीं. वेदकालीन किंवा स्मृतिकालीन वाङ्मयांत मगधाचा निर्देश पलाश या नांवानें केलेला आढळत नाहीं. कांहीं प्राचीन पाश्चात्य लेखकांच्या प्रवास वर्णनांत आलेला प्रासी–इ हा शब्द पराशीय (पलाशीय अथवा मगध) ह्याचा निदर्शक असावा असा कनिंगहॅमचा समज आहे. पण हा समज आमच्या मतें चुकीचा दिसतो, व ह्या म्हणण्यास कनिंगहॅमच्याच लेखांत पुष्टि मिळते. कारण कनिंगहॅम, Ancient Geo. of Ind. p. 520, येथें म्हणतो, "Strabo and Pliny call the people of Palibothra "Prasii," which modern writers have unanimosly referred to the Sanskrit Prāchya or "eastern."" ह्यावरून असें निर्विवाद ठरतें कीं, पाश्चात्य लेखकांनीं निर्दिष्ट केलेला "Prasii" हा शब्द, संस्कृत प्राच्य किंवा प्राच्याः ह्या शब्दाचा अपभ्रंश होय. श्रीमद्भागवत, स्कं. १, अ. ३ ह्यांत मगधाचा उल्लेख कीकट ह्या शब्दानें केला असून पलाश ह्या नांवानें केला नाहीं हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे.––R. P. J.

गेला. शेवटीं तुकंभट्टांचें अग्निहोत्र राजसत्तेच्या बळावर कित्येक कोंकणस्थ भिक्षुकांनीं भग्न केलें ह्मणून हा तंटा निकालाकरितां नानासाहेबांकडे पुण्यास गेला. बाळाजीनें पुष्कळ दिवस तें प्रकरण तसेंच ठेवून शास्त्रदृष्ट्या अखेरच्या निकालाकरितां नाशीक येथील ब्रह्मवृंदाकडे रवाना केलें. बराच कालावधि गेल्यानंतर त्यांनीं तुकंभट्टांच्या तर्फेनें निकाल दिला. * परंतु वसईप्रांतीं त्यांस मिळावा तितका न्याय न मिळाल्यामुळें, म्हणजे ज्या गृहस्थांनीं अग्निहोत्राचा विध्वंस केला त्यांस शिक्षा न झाल्यामुळें तुकंभट्ट व त्यांचे कित्येक अनुयायी असंतुष्ट झाले व ते इंग्रजांच्या आश्रयानें मुंबईस येऊन राहिले. ह्या कालापासून वसई व साष्टी प्रांतीं राहणाऱ्या तुकंभट्ट ह्यांच्या वंशजांस पळशीकर किंवा पळशे ह्या नांवानें त्यांचे विरोधी किंवा प्रतिस्पर्धी लोक संबोधूं लागले. हे सर्व माध्यंदिन शाखेचे शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण असून ह्यांची वसति हल्लीं मुंबई, साष्टी, वसई इत्यादि उत्तर कोंकणांतील प्रांतांत आहे; आणि त्यांच्याकडे ह्या सर्व प्रदेशांतील ज्योतिषी व पौरोहित्याचीं वतनें परंपरेनें अव्याहत चालू आहेत.

(२) गोवर्धन ब्राह्मण.

गोवर्धन ब्राह्मणांची वसति उत्तर कोंकणांत फार प्राचीन काळापासून झाली असून, गोवर्धन ब्राह्मण हें नांव त्यांस, त्यांचें मूळ-

---

* परिशिष्ट B पहा.

स्थान जो गोवर्धन प्रदेश त्यावरून प्राप्त झालें असावें असें दिसतें. कांहीं लेखकांचा असा तर्क आहे कीं, हा गोवर्धन प्रदेश म्हणजे मथुरेजवळील गोवर्धन गांव होय. परंतु हा समज चुकीचा दिसतो. आमच्या मतें गोवर्धनांचें मूलस्थान नाशिक जिल्ह्यांत असून नाशिकाच्या कांहीं भागास प्राचीन काळीं गोवर्धन अशी संज्ञा होती अशा अर्थाचा पुरावा नाशिक येथील शातवाहन नृपतींच्या शिलालेखांत सांपडतो. शातवाहन घराण्यांतील सुप्रसिद्ध भूपति गोतमीपुत्र शातकर्णी ह्याच्या नाशिकाजवळील गुहेंतील शिलालेखांत गोवर्धन प्रांताचा उल्लेख असल्यामुळें त्या सदरहू लेखाचा * कांहीं भाग आम्हीं खालीं देत आहों:—

" सिधं सेनाये वेजयंतिये विजयखधावारा गोवधनस बेनाकटकास्वामि गोतमिपुतो सिरिसदकणि (२) आनपयति गोवधने अमचं विण्हुपालितं. " ह्याचा अर्थ असा कीं, " सिद्धास नमन करून प्रख्यात गोतमीपुत्र शातकर्णी राजा, गोवर्धन प्रांतांतील बेनाकटक ह्या वैजयंती सेनेच्या विजयशिबिराहून गोवर्धन प्रांतांत असलेल्या आपल्या विष्णुपालित नामक प्रधानास पुढीलप्रमाणें आज्ञा करितो. "

---

* नाशिक येथील शिलालेख नंबर ४ पहा.

वर निर्दिष्ट केलेला शिलालेख प्राकृतांत असून त्याचें संस्कृत भाषांतर पुढें दिल्याप्रमाणें होईल:—

" सिद्धं (प्रणम्य) सेनाया वैजयंत्या विजयस्कंधावाराद्गोवर्धनस्य बेनाकटकात्स्वामी गौतमीपुत्रः श्रीशातकर्णिराज्ञापयति गोवर्धने अमात्यं विष्णुपालितं."

वरील उताऱ्यावरून नाशिकाच्या कांहीं भागास प्राचीन काळीं गोवर्धन अशी संज्ञा होती असें निदर्शनास येतें.

उत्तर कोंकणांतील माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मणांच्या कांहीं प्राचीन लेखांवरून असें समजतें कीं, यादव घराण्यांतील रामदेव भूपतीचे द्वितीय चिरंजीव भीमदेव (बिंबदेव) ह्यांनीं उत्तर कोंकणांतील जोशीपणाची व उपाध्येपणाची वृत्ती गोविंद मिटकर नामक गोवर्धन ब्राह्मणाची विधवा चांगुणाबाई हिच्याकडून विकत घेऊन ती शके १२२१ ह्या वर्षीं सूर्यग्रहणीं आपले कुलगुरु पुरुषोत्तमपंत कावळे ह्यांस दान दिली. ह्यावरून असें व्यक्त होतें कीं जोशी व उपाध्येपणाचे हक्क इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत गोवर्धनांच्या स्वाधीन होते. व ह्यापुढें ते अधिकार माध्यंदिनांस प्राप्त झाल्यामुळें जरी उत्तर कोंकणांत गोवर्धनांचें धर्मगुरु ह्या नात्यानें महत्त्व कमी झालें तरी सन १७४२ पर्यंत म्हणजे नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीच्या आरंभापर्यंत दक्षिण कोंकणांत पेण, पनवेल वगैरे गांवीं जोशी व उपाध्येपणाचे अधिकार गोवर्धन ब्राह्मणच चालवीत होते असें त्यांच्या कांहीं जुन्या लेखांवरून दिसून येतें. परंतु पुढें नानासाहेबांच्या कारकीर्दींत पेशव्यांच्या जातीच्या अधिकाऱ्यांनीं व विशेषतः भटभिक्षुकांनीं गोवर्धनांची वृत्ती हरण करण्याच्या हेतूनें त्यांचा छळ करण्याचे व त्यांस गोळक ही संज्ञा देऊन अब्राह्मण ठरविण्याचे प्रयत्न सुरू केले असा

कांहीं गोवर्धन लेखकांचा समज आहे, आणि हा समज अगदींच निराधार आहे असें आम्हास वाटत नाहीं.

गोवर्धन व सामवेदी हे उत्तर कोंकणांतील फार प्राचीन काळचे ब्राह्मण रहिवासी होते असें जुन्या लेखांवरून सिद्ध होतें. असें असूनही गोवर्धनांस गोळक व सामवेदीयांस सोपारे असें म्हणण्याचा प्रघात जो नानासाहेब प्रभृति पेशव्यांच्या कारकीर्दींत सुरू झाला तो निराधार असून अत्यंत निंद्य होय. हिंदू समाजांतील पोटभेद नाहींसे होऊन ऐक्याभिवृद्धि व्हावी अशी ज्यांची मनःपूर्वक इच्छा असेल त्यांच्याकडून ह्यापुढें तरी गोवर्धन ब्राह्मणांस गोळक व सामवेदी ब्राह्मणांस सोपारे अशी संज्ञा देण्यांत येणार नाहीं अशी आम्हीं आशा करितों.

(३) उत्तर कोंकणांतील सोमवंशी क्षत्रिय.

सोमवंशी क्षत्रिय ह्यांचे पूर्वज मूळचे देवगिरीच्या साम्राज्यांतील पैठण वगैरे प्रांतांत रहाणारे असून ते शके १२१६ (इ. स. १२९४) त रामदेवाचा दुसरा मुलगा भीमदेव ह्याचे समागमें उत्तर कोंकणांत आले. भीमदेवाचे कुलगुरु माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मण पुरुषोत्तमपंत कावळे हे होत, व हलींच्या उत्तर कोंकणांतील सोमवंशीय क्षत्रियांचे कुलगुरु ह्या पुरुषोत्तमपंतांचे किंवा त्यांच्याबरोबर आलेल्या स्वशाखीय ब्राह्मणांचे वंशज आहेत. देवगिरीचे यादव सोमवंशीय राजे होते; व ह्यामुळें मुंबईतील सोमवंशी

क्षत्रिय व देवगिरीचे यादव ह्यांचा इतर सोमवंशीय घराण्यांशीं संबंध असावा असेंही दिसतें. ह्यांस पांचकळशी असेंही म्हणतात; आणि हें नांव वराच्या सिंहासनास असलेल्या पांच कळसांवरून निघालें असावें असा कित्येकांचा समज आहे तो चुकीचा आहे. दुसऱ्या अनेक जातींत लग्नांतील सिंहासनास पांच कळस असत व असतात तेव्हां त्यांसही पांचकळशी कां म्हणूं नये? आमच्या मतें ह्या नांवाची उत्पत्ति पंच+कुल+वंशी ह्या तीन शब्दांपासून झाली आहे व हें कात्यायनाच्या प्राकृत व्याकरणाशीं ज्यांचा परिचय असेल त्यांच्या सहज लक्षांत येईल. ज्याप्रमाणें शिवाजीच्या वेळेस अष्टप्रधान होते किंवा इंग्रज सरकाराचे कॅबिनेट मिनिस्टर आहेत, त्याप्रमाणेंच कांहीं क्षत्रिय राजांच्या दरबारांत प्राचीनकाळीं पंचकुल हे निरनिराळ्या खात्यांचे मंत्री किंवा मुख्य अधिकारी असत. ह्या सोमवंशी क्षत्रियांची वसति मुंबई, साष्टी, वसई, माहीम, उरण वगैरे ठिकाणीं बरीच आहे. पोर्तुगीजांच्या वेळीं इतर वरिष्ठ जातींप्रमाणें ह्यांच्यावरही बराच जुलूम झाल्यामुळें त्यांपैकीं बरेच उरण, चौल ह्या प्रांतीं गेले. ह्यामुळें त्यांच्यांत वसईकर, साष्टीकर, उरणकर असे पोटभेद झाले आहेत. वास्तविक पाहिलें असतां हे सर्व लोक एकच असून ह्यांच्यांत परस्पर रोटीबेटी व्यवहारास प्रत्यवाय नसला पाहिजे. व स्थानभिन्नत्वामुळें झालेले हे क्षुल्लक पोटभेद लवकरच नाहींसे होतील अशी आम्हीं आशा करितों.

(४) उत्तर कोंकणांतील पाठारे प्रभु.

पाठारे प्रभु ज्यांस पाताणे किंवा पैठणी प्रभु असेंही म्हणतात, त्यांची वसति उत्तर कोंकणांत विशेषतः मुंबई, माहीम, साष्टी, ठाणें व वसई इत्यादि ठिकाणीं आढळते. पाठारे हें नांव जातिवाचक नसून जातिसूचक आहे. आमच्या मतें पाठारे हा शब्द प्रतिहार ह्या संस्कृत शब्दापासून निघाला आहे व त्याची व्युत्पत्ति पुढें लिहिल्याप्रमाणें दाखवितां येईल. (प्रतिहार किंवा प्रतिहारी=पडिहार किंवा पटिहार=पाठारा किंवा पाठारी) पुराणांतरीं प्रतिहार हा शब्द परिहर किंवा परिहार ह्या नांवानें आढळतो. आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासाच्या अवलोकनानें आपल्या लक्षांत असें येतें कीं, प्रतिहार घराण्यांतील राजे पराक्रमी होऊन गेले. ह्या प्रतिहारांचीं चार घराणीं असून कान्यकुब्ज किंवा कनोज येथील घराण्याची गणना सार्वभौम राजांत होत असे. कनोज येथील सार्वभौम घराण्याचा संस्थापक नागभट्ट असून त्यानें, इ. स. च्या नवव्या शतकाच्या आरंभीं, हर्षवर्धनाच्या वंशांतील चक्रायुध नांवाचा राजा राज्य करीत असतांना, बरोबर गुर्जर सैन्य घेऊन कनोजवर स्वारी केली व चक्रायुधाचा पराभव करून कनोज येथें प्रतिहार घराण्याची सत्ता प्रस्थापित केली. ह्या कनोजच्या प्रतिहार घराण्यामध्यें महेंद्रपाल किंवा निर्भर नांवाचा राजा फार पराक्रमी होऊन गेला व त्याच्या पदरीं प्रसिद्ध कवि राजशेखर होता. हा राजशेखर महाराष्ट्रीय यजुर्वेदी ब्राह्मण असून तो स्वतःस आपल्या

काव्यांत "राजकुलगुरु किंवा महाराष्ट्रचूडामणि" असें म्हणवितो. ह्यावरून राजशेखर हा प्रतिहारांचा कुलगुरु असून महाराष्ट्रीय ब्राह्मण होता हें निर्विवाद ठरतें. ह्या प्रतिहार घराण्यांतील शेवटचा राजा राज्यपाळ राज्य करीत असतांना इ. स. १०१८ च्या डिसेंबर महिन्याच्या प्रारंभीं गझनीच्या महंमुदानें कनोजवर स्वारी करून तेथील राजाचा व त्याच्या सैन्याचा मोड करून तें शहर लुटलें व पुष्कळ लोक ठार मारले. ह्या बिकट प्रसंगीं अनेक लोक आश्रयासाठीं सैरावैरा दाही दिशांस पळूं लागले. ह्याच सुमारास प्रतिहार किंवा पाठारे प्रभु ह्यांचे पूर्वज देवगिरीच्या सम्राटांच्या आश्रया-साठीं पैठणास आले असें दिसतें; व तेथें राहिल्यामुळें पुढें, म्हणजे जेव्हां ते भीमदेव व त्यांचे कुलगुरु यजुर्वेदी ब्राह्मण ह्यांचे-बरोबर उत्तर कोंकणांत आले त्यावेळीं, त्यांस पैठणे प्रभु किंवा पैठणकर प्रभु अशी संज्ञा प्राप्त झाली आणि पाताणे (पैठणे) हें नांव पैठण ह्या शब्दाचा अपभ्रंश होय.

पाताणे किंवा पैठणे नांव स्थलवाचक असून त्याचा संबंध पैठण शहराशीं आहे असें सह्याद्रिखंडकाराचेंही मत आहे. हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईलः—

> पैठणे पत्तने शप्त्वा मया कोपवशात्किल।
> पाठारीयाः प्रसिद्धा ये पैठणाख्या भवन्तु ते ॥

सह्याद्रिखंडाचा कर्ता उत्तम संस्कृतज्ञ असल्यामुळें प्रतिष्ठान हें पैठण ह्या शब्दाचें संस्कृत नांव आहे ही गोष्ट त्यास अवगत

असलीच पाहिजे. परंतु (पत्तन) पाताणे हें नांव पैठण ह्या शब्दापासून झालें आहे असें त्यास दाखवावयाचें असल्यामुळें त्यानें पैठणे पत्तने असा शब्दप्रयोग केला आहे. आपल्या नेहमीं पहाण्यांत येतें कीं, मनुष्य परकीय स्थळीं कायमचा रहाण्यास गेला असतां, ज्या स्थळाहून तो आला असेल, त्या मूळ स्थळाचा निर्देश त्याच्या नांवाबरोबर केला जातो; उदा० मारवाड देशाहून आलेले ते मारवाडी, कारवार देशाहून आलेले ते कारवारी, जोधपुराहून आलेले ते जोधपुरी, इत्यादि. आतां कदाचित् अशी पृच्छा करण्यांत येईल कीं, पैठणाहून आलेले प्रभु ह्यांस जर पैठणकर म्हटलें तर त्यांच्याबरोबर आलेले त्यांचे यजुर्वेदी कुलगुरु ह्यांस किंवा ज खुद्द पैठणाहून आले त्यांस तरी पैठणकर ह्या नांवानें कां संबोधूं नये, व तसें असल्यास त्या संबंधाचा पुरावा काय आहे? भीमदेवाबरोबर आलेले त्यांचे राजगुरु पुरुषोत्तमपंत कावळे ह्यांचे वंशज जे उत्तर कोंकणांत आले त्यांस पैठणकर असें म्हणूं लागले असा प्राचीन लेखांत कागदोपत्रीं पुरावा मिळतो. मागें पृ. ५९ त दर्शविलें आहे कीं, गोवें येथील गव्हर्नराचा मुलगा बहादुरखान गेलानी ह्यानें साष्टी, मुंबई, माहीम वगैरे उत्तर कोंकणांतील बराच मोठा प्रांत इ. स. १४९० च्या सुमारास काबीज केला होता व सुमारें एक वर्षपर्यंत तो त्या प्रांतावर अंमल चालवीत होता. त्यावेळीं ह्यानें साष्टी प्रांतांतील जमीनदारांस त्यांच्या सनदा बहाल करून दिल्या होत्या, त्यांपैकीं कांहीं कागदपत्र अद्यापि उपलब्ध आहेत. भीमदेवाचे कुलगुरु

राजगुरु पुरुषोत्तमपंत कावळे ह्यांच्या वंशजांस त्यानें दिलेल्या सनदां-पैकीं पांच कागदपत्र मुंबई गॅझेटीयरचे कर्ते Mr. S. M Edwards, I. C. S., C. V. O. ह्यांच्या अवलोकनांत आले असून त्यांतील मजकुरासंबंधानें त्यानीं आह्मांस लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे:——

"Fazalullah has returned to me the five Persian documents with the opinion that they refer to lands and persons, not in the island of Bombay but in the Thana district. They purport to be grants of land by the Ghelani to a family of Paithankars."

वरील उताऱ्यावरून असें लक्षांत येईल कीं पाठारे प्रभूंच्या मूळच्या कुलगुरूंसही उत्तर कोंकणांत आल्यावर पैठणकर हीच संज्ञा प्राप्त झाली होती.

कित्येक लेखकांचा असा समज आहे कीं, पाठारे प्रभु हे गुजराथेंतून कोंकणांत आले, कारण त्यांच्या भाषेंत गुजराथी शब्द आढळून येतात व पोषाखही कांहीं अंशीं गुजराथी थाटाचा दिसतो. हें म्हणणें यथार्थ दिसत नाहीं, कारण ज्या प्रदेशांत व समाजांत परकी मनुष्य फार दिवस रहातो त्या प्रांताच्या भाषेचा व पोषाखाचा थोडाबहुत तरी संस्कार त्या मनुष्यावर घडून येतो असें नेहमीं दिसून येतें. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, स्त्रियांचा पोषाख सामान्यतः बदलत नसतो. गुजराथी स्त्रिया मुक्तकच्छ असतात, परंतु पाठारे प्रभु ह्यांच्या स्त्रियांचा पोषाख तसा नसून तो महाराष्ट्रीय स्त्रियां-

प्रमाणेंच असतो. तिसरा आक्षेप भीमदेव (बिंब) व त्याचे अनुयायी ह्यांच्या आगमनासंबंधाचा असून तो असा आहे कीं, इ. स. ११ व्या शतकाच्या आरंभीं म्हणजे महंमुदानें सोमनाथ घेतल्यावर गुजराथच्या सोळंकी घराण्यांतील बिंब नांवाचा राजा उत्तर कोंकणांत येऊन तेथें त्यानें आपली गादी स्थापन केली; व त्याच्याबरोबर पाठारे व त्यांचे कुलगुरु उत्तर कोंकणांत आले. पण ह्या आक्षेपास इतिहासाचा पुरावा नाहीं. उत्तर कोंकणाच्या इतिहासाच्या सूक्ष्म अवलोकनावरून असें दिसून येईल कीं, इ. स. १०१७ पासून तों इ. स. १२६० पर्यंत उत्तर कोंकणप्रांत शिलाहारांच्या ताब्यांत होता व इ. स. १२६० मध्यें यादवांचा राजा महादेव ह्यानें सोमेश्वराचा पराभव करून उत्तर कोंकणप्रांत आपल्या अमलाखालीं आणला, हा सर्व वृत्तांत प्रस्तुत पुस्तकाच्या ऐतिहासिक भागांत दिला असून इ. स. १२६० पासून तों इ. स. १३४७ पर्यंत म्हणजे मुसलमानी अंमल सुरू होईपर्यंत उत्तर कोंकणप्रांत यादव किंवा त्यांचे संबंधी ह्यांच्या ताब्यांत होता असेंही दर्शविलें आहे. अतएव भीमदेव (बिंब) व त्याचे अनुयायी ह्यांच्या आगमनाबद्दलचा आक्षेप--म्हणजे बिंब व त्याचे अनुयायी गुजराथेंतून आले, असा जो कित्येक लेखकांचा समज आहे तो, निराधार असून सर्वथैव चुकीचा आहे असें दिसून येईल.

पाठारे प्रभु समाजाचें खाणें पिणें, पोषाख, चालीरीती व एकंदर रहाणें बहुशः श्रीमंती थाटाचें असतें ह्यावरून व विशेषतः त्यांच्या

प्राचीन इतिहासाच्या सूक्ष्म अवलोकनावरून असें दिसून येतें कीं, हा समाज मूळचा अभिजात किंवा क्षात्रवंशसंभव असला पाहिजे. असें असूनही कांहीं सुशिक्षित पण कुतर्कवादी लेखकांनीं त्यांस पोलिस रखवालदार बनविण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो आमच्या मतें सर्वथैव अनुचित व अश्लाघ्य होय. ह्या विषयासंबंधीं आमचे विचार आह्मीं उपोद्‌घातांत प्रदर्शित केले आहेत. तेव्हां त्यांची येथें पुनरुक्ति करण्याची आवश्यकता नाहीं.


आपल्या भरतखंडांत जितक्या असंख्य जाती व पोटजाती अस्तित्वांत आहेत तितक्या जाती व पोटजाती जगांतील कोणत्याही देशांत आढळून येत नाहींत. ह्यांतील पुष्कळ भेद व पोटभेद अगदीं क्षुल्लक कारणांवरून निर्माण झाले असून त्यांस धर्मशास्त्राचा आधार नाहीं. आणि आपल्या अवनतीचीं व परवशतेचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांत आपले असंख्य जातिभेद, तदनुरोधानें उत्पन्न होणाऱ्या परस्पर उच्चनीचत्वाच्या कल्पना आणि स्वार्थत्याग व ऐक्य ह्यांचा अभाव हीं प्रमुख कारणें होत. ह्याकरितां, आपल्या समाजांतील प्रत्येक स्वदेशहितचिंतकानें व विशेषतः होतकरू तरुणांनीं आपल्या समाजांतील वरील दोष नाहींसे करण्यासाठीं मनःपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत; आणि असें जर होईल, तर आमची परवशता लयास जाऊन स्वराज्याची प्राप्ति अल्पावधींत होईल ह्यांत संदेह नाहीं.

प्रकरण सातवें.

परिशिष्टें.

परिशिष्ट A.

श्रीमंत चिमणाजी आप्पा ह्यांनीं फिरंग्यांवरील मोहिमेसंबंधानें मालाडचे सरदेसाई अंताजी रघुनाथ कावळे ह्यांना लिहिलेल्या अस्सल पत्राचें छायाचित्र.





[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]



परिशिष्ट B.

श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे ह्यांनीं अग्निहोत्री वे. तुकमभट जावळे, पळशीकर ह्यांस दिलेल्या अस्सल आज्ञापत्राचें छायाचित्र.





APPENDIX C.

The Patent of Chief Justice Courtney.

---:o:---

Whereas various and sundry disputes have arisen concerning ye right of administering the rites and ceremonies of the Gentoos of this Island and have continued a long time undetermined not only to the great prejudice of the person in whom the said right is vested, but also to the great detriment of this Island, by the unlimited License of Ye Brahmans resorting hither as well as drawing the money of the inhabitants as several other ill-practises tending to disturb the peace and good Government thereof. It being absolutely necessary effectually to put a stop to this evil and the many inconveniences attending it. In order thereto the pretensions of the several claimants having been impartially examined and their several reasons inquired into, and twelve men, heads of their religion, four from each caste having been summoned and their opinion required under their hands whereby it is become their proper act and no objection can ever arise and they having unanimously given it as their opinion that the sole right of administering the said rites and ceremonies of their religion is vested in Shama Charia (exclusive of all others, both by right of succession

and otherwise) and that the said Shama Charia Brahmin is a person well affected to the English Government and every way duly qualified for the said Office.

SEAL.
Entered in the registers of the Court of Bombay.
A. UPRON,
Registrar.

For the above consideration and well to answer ye purposes therein mentioned, I, J. Courtney, Chief Justice of the Port and Island of Bombay being sworn to do justice according to equity and a good conscience, do by the order and with the consent of the Hon'ble Mr. Phipps, Esquire, President and Governor of H. M.'s Castle and Island of Bombay, etc., confirm the aforesaid Shama Charia Brahmin in his said right of presiding over the Gentoos of this Island so far as it relates to the administering the rites and ceremonies of their religion and the ordering and directing what Brahmins shall officiate under him hereby granting him our Patent confirming him for ever in the said rite and all ye profits, perquisites and advantages arising..................Behaving himself agreeable to the known laws and customs of their religion and as a good subject to this Government requiring by virtue of these Presents entire obedience from all the Gentoos on this Island to his orders and directions in what concerns their religion and to the rights he is solely vested with both by the Hon'ble the Governor's Proclam-

ation of the 27th May last past and by this my Patent granted under the great seal of my Office as Chief Justice of the Court of Bombay and entered in the Register of the said Court. Given in Bombay this twenty-first day of August, in the year of Our Lord God one thousand seven hundred and twenty-three and in the tenth year of the reign of our Sovereign Lord George of England, Scotland, France and Ireland, King, Defender of the Faith, etc.

JOHN COURTNEY.

APPENDIX D.

Statement of Bombay Population according to castes, prepared by Government, in 1761 and 1780.

1761.	1780.	
BOMBAY.	BOMBAY.	MAHIM.
Rugvedi Brahmans. Gujarati ,, Yajurvedi ,,	Rugvedi Brahmans. Palshe (Yajurvedi) Brahmans.	Rugvedi Brahmans. Palshe Brahmans * Gujarati Brahmans.

* The facts in connection with the origin and unjustifiable use of the name Palshe in the Census Reports were brought to the notice of the Government of Bombay, and in his official letter to Rao Saheb P. B. Joshi, dated, 22nd March 1911, Mr. P. J. Mead, I. C. S., Superintendent of Census and Under-Secretary to Government, Census Branch, observed :—

" I consider that you have proved your case in that you show that Palshikar Brahmans are a section of the Yajurvedi Brahmans, and as we do not go below that I shall class all Palshikars as Yajurvedi Deshastha Brahmans and explain that this covers both Taitiriya and Shukla Yajurvedis, and that the latter includes the Shukla Yajurvedis of the Madhyandin Shākhā who have since the famous quarrel been known as Palshikar Brahmans." The correction was accordingly made in the Census Report of 1911.—R. P. J.

1761.	1780.	
BOMBAY.	BOMBAY.	MAHIM.
Shenvis.	Gujarati Brahmans.	Shenois and Chittis (Chitpavans).
Parbhus.	Shenvi Brahmans.	Prabhus.
Banias.	Prabhus.	Goldsmiths.
Goldsmiths.	Goldsmiths.	Banias.
Coppersmiths.	Banias.	Bhansalis.
Ironsmiths.	Coppersmiths.	Coppersmiths.
Bhansalis.	Weavers.	Panch Kalshis of Parel.
Weavers.	Bhansalis.	Agri Kunbis.
Pansilas (Panchkalshis).	Carpenters.	Kunbis of Nagaon.
Charsilas.	Panch Kalshis.	Sion Coolies.
Bhandaris.	Chau Kalshis.	Kunbis of Matunga.
Christians.	Bhatias.	Mahim Panch Kalshis.
Parsis.	Parsis.	Kunbis of Sion.
Moors.	Ironsmiths.	Agris of Thakurwadi.
Potmakers.	Bhandaris.	Bhoivada Kunbis.
Matmakers.	Tailors.	Mahim Sattas Coolies.
Tailors.	Sweetmeat-makers.	

1761.	1780.	
BOMBAY.	BOMBAY.	MAHIM.
Shoemakers.	Telara Kunbis.	Mahim Bhandaris.
Barbers.	Kunbis.	Kunbis of Siwri.
Turners.	Kilme Kunbis.	Kunbis of Vadala.
Washermen.	Surat Kunbis.	Bhandaris of Matunga.
Carpenters.	Turners.	
Hamals.	Mat-makers.	
Sweetmeat Makers.	Tarias of Surat.	
Bombay Coolies.	Moormen.	
Thana "	Coolies of Bombay, Tánker and Mazagaon.	
	Oil-makers.	
	Golas.	
	Pot-makers.	
	Barbers.	
	Christians.	
	Shoemakers.	
	Washermen.	

परिशिष्ट E.

श्रीशाहूछत्रपति ह्यांच्यातर्फे श्रीमंत बाजीराव बल्लाळ ह्यांनीं मालाडचे सरदेसाई अंताजी रघुनाथ ह्यांचे बंधु रामचंद्र रघुनाथ व गणेश रघुनाथ ह्यांस दिलेल्या करारांतील कलमांची यादी.

श्री.

यादी मुद्दे करार फिरगाण

श्री.
राजा शाहु नरपति
हर्षनिधान बाजीराव बल्लाळ
मुख्य प्रधान.

रामचंद्र रघुनाथ व गणेश रघुनाथ सरदेसाई व सरदेशपांडे वसई वगैरे गांव साबानला वृत्तीबद्दल १० कलम

रासगांव

अर्जोजी येशवंतराव यास दोनसें माणसाची सरदारी व एक पत्र जे साहित्य होईल तें करावें.

कलम १

वरकड कितेक लोक कार्यकर्ते आहेत त्याचे उर्जित करावे.

कलम १

सरदार त्या प्रांतें माहित आहेत असामी २० वीस त्यास याची सर सनदकी तुमचे चालऊं

कलम १

रयेती व वतनदार मुदामी थल व इत्यादी सेतें व सिलोतरें

व वेका पूर्वीं पासून * सुलतान बहादरचे कारकीर्दी त्याप्रमाणें चालवावें. सनद १

पांच कळसे लोक आहेत त्याचा गौर करावा चालवावें सुदामत इनामे असतील तीं चालवावें. कलम १

जे पुढें जाऊन स्वामिसेवा येकनिष्ठ करून कार्य करितील त्यास आम्ही सांगोन त्यास पालख्या ७ साताजणास सात द्याव्या. कलम १

येणेंप्रमाणें मुद्दे जबानी जिवाजी गोविंद करार केले असत. छ १९ माहे रजब (लेखनसीमा).

---

* सुलतान बहादर हे इ. स. १५२६–१५३६ त गुजराथचे अधिपति असून कोंकणप्रांत त्यांच्या अंमलाखाली होता.